

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. ५६६

..घरबसल्या जगप्रवास-१.

# मॉरिशस



REFBK-0020453
REFBK-0020453

वू प्रकार

ध. क्र. २०८५३.
30131६९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

16 JAN 1980

[ कृ. मा. प. ]

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
क्रमांक ...R0843... दि: ...
... 4EE ... 30/3/1994

घर बसल्या जगप्रवास .... १

संयोजक – प्रा. भालबा केळकर

# मॉरिशस

लेखक : कृ. पं. देशपांडे

REFBK-0020453

REFBK-0020453

मूल्य : तीन रुपये पन्नास पैसे

सहयोग प्रकाशन, पुणे २.

प्रमुख विक्रेते :

रसिक साहित्य

अप्पा बळवंत चौक, पुणे ३०.

प्रकाशक :

मा. द. नांदुरकर

६८३ बुधवार पेठ, पुणे २.

◆ ◆ ◆

प्रथम मुद्रण १९७३

◆ ◆ ◆

मुद्रक :

वि. ना. भंडारे

स्वानंद मुद्रणालय,

२०३, शनवार पेठ, पुणे ३०.

# ही मालिका कशासाठी ?

‘एकदा काश्मीरला जाऊन आलं पाहिजे बुवा !’

‘खरं म्हणजे हिमालय प्रवास. हृषिकेश ओलांडल्यावर खरी निसर्गाची मजा आणि आगळे अनुभव.’

‘कन्याकुमारी पहा ! तिथला सूर्योदय आणि सूर्यास्त ! वंडरफुल !’

‘अंदमान आणि निकोबार बेटं काय आहेत तो पाहिली पाहिजेत हं एकदा !’

‘आणि तिकडे खाली जावा, सुमात्रा ! तिथल्या चालीरीती बऱ्याचशा भारतीय आहेत म्हणे.’

‘ऑस्ट्रेलियाजवळची ती प्रवालद्वीपांची ओळ ! वा: ! काय वर्णन आहे महाराजा ! भूलोकीचं नंदनवनच ! निळ्या पाण्याचा सागर, गर्द हिरवी वनराजी, स्वच्छ पाण्याचे धबधबे ! बस् तिथं जाणं जमलं पाहिजे!’

‘आपली तर न्यूझिलंडला जाण्याची तीव्र इच्छा आहे ! हवा आणि हिरवा उत्तेजक निसर्ग ! वा: !’

‘आणि वर तिबेट ? बर्फाच्छादित ल्हासा ? आपलं बद्रिकेदार ? मानस सरोवर ? पलीकडचा चीन ? बुद्ध आपला आणि त्याचा प्रसृत धर्म चीन, जपान मधे ! गंमत आहे नाही ?’

‘जपानला जायला हवं ! छोटी घरं ! छोटे बगीचे ! चटयावरचा चहा ! दुलईतली ती उबदार झोप ! ते काड्यांनी जेवायचं जेवण ! कागदी भिंती !’

‘आपल्याला तर बर्फाळ सैबेरियाची ओढ आहे बुवा ! गूढ आणि अफाट पसरलेला ! उन्हाळी झरे ! हिमखंडावरचा प्रवास !’

'हं ऽऽ ! ज्यूल व्हर्न वाचून बोलताय वाटतं ? पण आपण तिथं टिकणं फार अवघड आहे ! त्यापेक्षा स्विट्झर्लंड ! आपली एक इच्छा आहे. स्विट्झर्लंडमध्ये एखाद्या डोंगराळ भागात एखाद्या गुराख्याच्या झोपडीत जाऊन राहावं ! मस्त दूध, लोणी, भाकरी खायची आणि मोकळ्या हवेत हिंडायचं ! अरे क्षयरोगी बरे होतात खडखडीत, तर आपण बलभीम होऊ ऽऽ !'

'आणि इराक, इराण, अफगाणिस्तान, अरबस्तान एकदा बघायला काय हरकत ? इस्त्रायल सुद्धा ! मध्यपूर्वेतल्या निराळ्याच गंमती !'

'ईजिप्त आणि पिरॅमिड ! तिथं एकदा जाऊन यायचंय ! फार प्राचीन संस्कृती आणि तिचे अवशेष ! नुसत्या कल्पनेनं कसं मन थरारून जातं !'

'इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड, स्पेन, पोर्तुगाल आणि – – –'

'नॉर्वे, स्वीडन, रशिया ऽ ऽ !'

'रशिया तर ओरिएन्टल देश ! जुनी संस्कृती जपून नव्याला जागा देणारा ! म्हणजे त्यांच्या पुस्तकांतून जाणवतं तसं !'

'आइसलंड, ग्रीनलंड ! उत्तर ध्रुव ! अशा वेळी ज्यूल व्हर्न, एच्. जी. वेल्स आठवतात. अत्यंत अद्‌भूत, प्रत्ययकारी लेखन करणारे लेखक. त्यांनी आपल्या विज्ञान-नवलिकेतून काय कल्पनाविलास केला आहे.'

'दक्षिण समुद्रातली बेटं ? ती तर समृद्धी आणि सृष्टिसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत. स्टिव्हन्‌सनसारखा लेखक प्रकृतिस्वास्थ्यासाठी तिथं जाऊन राहिला होता.'

'अमेरिकेत तर उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत सारं जगच थोड्या अवकाशात बघायला मिळतं. बर्फाळ आणि दाट अरण्यांचा समृद्ध कॅनडा ! समृद्ध आणि वस्तुनिष्ठ संस्कृतीत आघाडीवर असलेले, उंच इमारतींचे, विस्तीर्ण शेतांचे अनेक उद्योगधंद्यांचे यू. एस्. ए., जुनी भारतीय संस्कृतीची जाणीव करून देणारे मेक्सिको; अमेझॉन नदीचे ब्राझील; त्यातली दाट अरण्ये, माया, इंका, अझ्टेक इत्यादी जुन्या संस्कृतींचे विशाल अवशेष, अमेझॉन मधली

राक्षसी कमळे, दक्षिण अमेरिकेचे दक्षिण टोक आणि या विस्तीर्ण भूखंडाच्या दोन्ही बाजूचे अटलांटिक आणि पॅसिफिक महासागर त्यातली अनेक बेटे. खरोखर या नवलखंडाला संपूर्ण भेट हेही एक स्वप्न बाळगायला हरकत नाही.'

अशा गप्पागप्पात आपण एकत्र जमलेली मित्रमंडळी थोडचा अवकाशात मनोवेगानं जगाचा प्रवास कितीतरी वेळा करतो. अनेक ठिकाणी जाऊन यावं असं आपल्याला मनोमन वाटत असतं. पण ते प्रत्यक्षात शक्य नसतं. पण अशावेळी जर त्या निरनिराळचा देशांची, ठिकाणांची, तिथल्या एकूण जीवनाची जर कुतूहलजनक मांहिती आपल्याला मिळाली तर आपण ती आधाशासारखी वाचून निदान मनानं तरी तिथे अगदी कानाकोपऱ्यात प्रवास केल्याचा आनंद मिळवतो. आणि हाही आनंद मिळवणं काही थोडकं नाही. किंबहुना अत्यंत निरोगी विद्यादायी करमणूक आहे. प्रत्यक्ष तुम्हाला अनेक ठिकाणी जायला पासपोर्ट, व्हिसा, चलन इत्यादी अनेक सव्यापसव्यातून मार्ग काढावा लागतो. पण मनाला तसं काही लागत नाही. प्रत्यक्ष प्रवासाला वर्ष लागतील. पण मनाला त्यासाठी काही क्षण सुद्धा पुरतात. त्यात तुमची कल्पकता जागी आणि तल्लख असली तर नुसत्या वाचनातून सुद्धा तुम्ही जगप्रवासाचा आनंद मिळवू शकता. म्हणून–

म्हणून बरं का केवळ, हा मालिका तयार करण्याचा सुखदायी खटाटोप. आम्हाला हा प्रवास आवडला. तुम्हालाही आवडावा ही इच्छा.

मग चला निघा मनःप्रवासाला! आता नाही थांबवून धरत तुम्हाला! अच्छा ऽऽ! शुभास्ते पन्थानः सन्तु!

★ ★ ★

## चला निघू या मॉरिशसला

' एक छोटासा भारत ' असं या बेटाचं सार्थ वर्णन केलं जातं–

' राक्षसवंशीय पण पुढे रामभक्त झालेल्या मारिचाचं निवासस्थान ते मॉरिशस असं म्हणतात. '

' भारतीयांना प्राचीन काळापासून द्वीप या नावाने हे बेट माहीत आहे. '

' पण अरबांचे हे दिनामगरबी आणि पोर्तुगीजांचे सेने, आणि डोडो पक्षी सापडत असे म्हणून डोडो बेट सुद्धा. '

' शेकडा त्रेपन्न हिंदू असलेले भारतीय संस्कृतीच्या छटा दाखवणारे हे बेट, भूतलावरचं नंदनवन मानलं जातं. '

' निसर्गानं आपण होऊन अत्यंत समृद्ध केलेलं बेट. सुवर्णयुगातील भारताची आठवण करून देणारं स्थान. '

' सुंदर निळ्या सागरानं वेष्टिलेलं हे बेट म्हणजे सुखकर अशा निवासाला येणाऱ्यांचा जणू स्वर्गच. फक्त अमृतच नाही. पण अमृतासारखं रुचकर अन्न पाणी. '

' समुद्र किनारा जसा शुभ्र रुपेरी वाळूनं आणि रंगी बेरंगी शंख शिपल्यांनी नयनमनोहर तसंच बेटाचं अंतरंगही छोटया नद्यांनी, धान्याच्या रोपांनी समृद्ध असलेल्या शेतांनी, धबधब्यांनी, तलावांनी, कुरणांनी नयनमनोहर आहे. '

या बरोबर परीतलावाजवळ शिवमंदिर आहे, मीनाक्षीमंदिर आहे, आर्यसभा आहे, विष्णूचं जुनं मंदीर आहे, एक मशीद आहे, चिनी पॅगोडा आहे. युरोपीय नावाची बंदरं आहेत, असा हा संस्कृतिसंगम आहे. '

' श्वेतद्वीप नावापासून ते आधुनिक मॉरिशस नावापर्यंत एक लोभनीय इतिहास या बेटामागे उभा आहे. '

' साखरेसाठी प्रसिद्धी असलेलं हे बेट, तंबाखूसाठीही प्रसिद्ध आहे. '

‘ फ्रेंच, इंग्रज, पोर्तुगीज इत्यादींनी प्रभुत्व गाजवून सुद्धा हे बेट भारतीयच राहिलं आहे. ’

‘ युद्धात – जागतिक युद्धात – या बेटाला डावपेचाचं स्थान म्हणून महत्त्व आहे, तर शांततेच्या काळांत सुखसमाधानाचे चार दिवस घालवायचं स्थान म्हणून महत्त्व आहे. ’

‘ भारतीयांनी परकीयांचा जुलूम सहन करून या बेटाचं नंदनवन करायला आपले श्रम खर्ची घातले आहेत. ’

‘ आता हे स्वातंत्र्य संग्राम करून स्वतंत्र झालं आहे. आणि खरोखर सर्व धर्म संगमातून एक विश्वधर्म निर्माण करणारं आनंदमय स्थान म्हणून आता जगाला ज्ञात आहे. ’

‘ तर असे हे मॉरिशस – वाचा, मनानं पहा आणि तसेच समृद्ध व्हा, अशी सदिच्छा ! ’

कार्तिक शुद्ध प्रतिपदा “ पाडवा ” संयोजक–प्रा. भालबा केळकर.
२७ ऑक्टोबर १९७३

# लेखकाचे निवेदन

ही मॉरिशस या छोटया देशाची थोडक्यात ओळख ! दोन वर्षांपूर्वी आमच्या संस्थेत ( पुणे विद्यार्थी गृह ) नऊ मॉरिशस विद्यार्थी सुमारे महिनाभर वास्तव्यासाठी आले होते. त्यांच्या व्यवस्थेतील काही भाग माझ्या-कडे असल्याने जवळीक निर्माण झाली आणि या देशाबद्दल आत्मीयता निर्माण झाली. त्यातून आमच्या विद्यालयात ' आंतरराष्ट्रीय सामंजस्य ' हा विभाग असून त्याचे काम करत असताना विद्यार्थ्यांना बऱ्याच वेळा या देशाची माहिती सांगितली, त्यातून या पुस्तकाचा जन्म ! जी माहिती माझ्या विद्यार्थ्यांना सांगितली, त्यात भर घालून, आज माझ्या अन्य विद्यार्थी मित्रांसाठी ती पुस्तक रूपाने सादर करताना मला आनंद होत आहे.

हे पुस्तक लिहीत असताना मॉरिशसमधील उपरोक्त विद्यार्थ्यांची मला फार मदत झाली. या दोन वर्षात त्यांनी वेगवेगळी पुस्तके, व्ह्यूकार्डस्, नकाशे व हस्तलिखित माहिती पाठवली. मॉरिशसला वास्तव्य करून आलेले माझे मित्र श्री. कुलकर्णी (नाशिक) यांनीही मला बरीच माहिती उपलब्ध करून दिली. या सर्व सहकार्याबद्दल मी त्या सर्वांचा ऋणी आहे. इतरही ज्या पुस्तकांचा मला उपयोग झाला त्यांचाही मी ऋणी आहे. यातील माहिती ही अशी जमा झाली आहे. मी फक्त निवेदनाचे, मांडणीचे काम केले आहे.

या पुस्तकाला चित्रसौंदर्य प्रदान करण्याचे काम केले आहे श्री. महाबळेश्वरकर यांनी. त्यांचेही मी आभार मानतो. प्रा. भालबा केळकर यांनी हस्तलिखित वाचून काही उपयुक्त सूचना केल्या. त्याचप्रमाणे या छोटया पुस्तकाला प्रस्तावना दिली याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे श्री. नांदुरकर व श्री. कोपर्डेकर यांनी या मालेची आखणी केली आणि माझं पुस्तक प्रकाशित करण्याची सर्वार्थाने जबाबदारी घेतली तेव्हा त्यांचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. याशिवायही ज्यांचे मला सहाय्य झाले त्यांचे आभार मानून हे निवेदन संपवतो.

विजया दशमी
६-१०-७३
१९०९ सदाशिव पेठ,
पुणे ३०.

— कृ. पं. देशपांडे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्वाधिकार
अनुक्रम 20.443 वि: 
५६६ नों. दि: ३०/३/५५

# १. असे हे मॉरिशस

पृथ्वीच्या नकाशात ठिपक्या एवढे दिसणारे मॉरिशस हे एक नितान्तरमणीय बेट !

असं म्हणतात की, परमेश्वरानं स्वर्गाची निर्मिती करण्याच्या आधी आपली सारी कल्पकता वापरून मॉरिशसची निर्मिती केली. आणि त्या धर्तीवर नंतर स्वर्ग निर्माण केला. मॉरिशसमधील लोकांत रूढ असणारी ही म्हण पाहिली की तेथील सौंदर्य किती असलं पाहिजे याची कल्पना आपल्याला करता येईल. या बेटाला 'भू-तलावरचे नंदनवन' म्हणतात. आणि खरोखर याला साजेसं त्याचं सृष्टिसौंदर्य आहे. तेथील हिरवीगार वनश्री, छोटचा-छोटचा टेंकडचा, हिरवीगार शेतं, इंद्रधनुष्य, समुद्र-किनारा ही सारी दृश्य आपल्यांला मोहवून टाकतात. अशा या बेटाची निसर्ग सुंदर सर्वांगीण पण थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न !

आज ज्या ठिकाणी हिमालय उभा आहे, तेथे पूर्वी मोठा समुद्र होता, असं सांगतात. पण निसर्गाच्या उलथापालथीत आज तेथे जगातील उंच पर्वत उभा आहे. त्याचप्रमाणे या बेटाच्या-बाबतीतही अशीच माहिती सांगितली जाते. आज हिन्दीमहासागर जेथे आहे तेथे आफ्रिकेपासून ते ऑस्ट्रेलियापर्यंत एक विस्तीर्ण देश पसरला होता. या देशात राहणाऱ्या लोकांचे दळणवळण

साऱ्या प्रदेशात होते. पण कालांतराने नैसर्गिक हालचालीमुळे हा प्रदेश खचला आणि जेथे पूर्वी हा विस्तीर्ण देश पसरला होता तेथे समुद्राचे पाणी खेळायला लागलं. अती उंच पर्वताची शिखरं मात्र यातून बचावली. आणि अभिमानानं उभी ठाकली. मॉरिशस आणि मॉरिशसजवळ असणारं बेट रियूनियन हे उंच पर्वताच्या शिखरावर असल्याने सुरक्षित राहिले.

मॉरिशसला 'एक छोटासा भारत' म्हटलं तर फारसं वावगं होणार नाही. ह्या बेटाची माहिती भारतीयांना फार पूर्वीपासून होती असं दिसतं. भारतीय व्यापारी याला "द्वीप" या नांवानं ओळखत होते. प्रभू रामचंद्राने ज्यावेळी रावणाचा पराभव केला त्यावेळी "मारिच" राक्षसाचे वंशज ते मॉरिशसमध्ये पळून आले. आणि त्यामुळे या बेटाला "मॉरिशस" हे नांव पडले. या लोककथेवरून भारतीयांचा या बेटाशी असणारा पूर्वापार संबंध सूचित होतो. आणखीही एक लोककथा काही भारतीयांत प्रचलीत आहे ती अशी–

फार वर्षांपूर्वी ज्यावेळी प्रभू रामचंद्र पंचवटीत राहात होते त्यावेळची ही गोष्ट. एके दिवशी जानकीने आपल्या झोपडीपुढे सोनेरी मृग पाहिला हा मृग सीतेला फार आवडला. त्याच्या सोनेरी कातड्याची चोळी आपल्याला घालायला मिळावी अशी तिच्या मनात इच्छा निर्माण झाली. 'या मृगाच्या कातड्याची मला चोळी करावयाची आहे. मला याचे कातडे मिळवून द्या' असा रामचंद्राकडे तिने हट्ट धरला. रामाने तो मृग मारला; पण तो 'मारिच' राक्षस होता. रामाच्या हातून मरण आल्याने मारिचाला बरे वाटले. तो रामाला म्हणाला– "प्रभू ! आपल्या


हातानें मृत्यू आल्याने मी पावन झालो आहे. आपल्या चरणापाशी एकच विनंती आहे की, माझा आत्मा सतत आपले नांव ऐकत राहील, असा वर मला द्यावा." रामानें 'तथास्तु' म्हणून त्याच्या शरीराला हात लावताच त्याचे रूपांतर एका मोत्यात झाले. काही विचार करून त्याने तो दक्षिण दिशेला फेकून दिला. तो समुद्रात पडताना मारिचाने पुन्हा आपले अवाढव्य शरीर धारण केले.

या द्वीपावर कालान्तराने झाडे उगवू लागली. वारा वाहू लागला. पण मानवापैकी तेथे अजून कुणीच वास्तव्य केलें नव्हते. बऱ्याच वर्षांनी काही माणसे तेथे आली. काही दिवस राहून गेली. मारिचाला रामाचे नांव ऐकयला मिळाले नाही. याप्रमाणे एकदा, दोनदा, तीनदा झाले. बिचाऱ्या मारिच्याच्या मनातील इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. तरीही रामानें सांगितलेल्या वचनावर त्याचा पूर्ण विश्वास होता. अखेरीस एकोणीसाव्या शतकात इंग्रज लोकांनी बिहारमधून काही भारतीय लोक आणले. त्यांनी आपल्या बरोबर 'रामायण' आणले. दिवसभर ऊसाच्या शेतात घाम गळेपर्यंत काम करावे आणि रात्री आपल्या झोपडीत रामायणाचा पाठ करावा अशी त्यांची दिनचर्या सुरू झाली. आणि तेव्हापासून 'मारिचा 'च्या आत्म्याला रामनामाचा ध्वनी ऐकू येऊ लागला. आजतागायत तेथे रामायण वाचले जाते.

ही लोककथा मॉरिशसचे भारतीयत्व सांगण्यास पुरेशी आहे. ह्या उदाहरणावरून मॉरिशसचे पुरातनत्व आणि भारतीयत्व यासंबंधी माहिती मिळाली तरी या बेटाला पूर्वीपासून 'मॉरिशस' हेच नांव होते असे मात्र नाही. ज्या जमातीचे अथवा देशाचे

लोक तेथे आले त्यांनी आपापल्या मर्जीप्रमाणे त्या बेटाला वेगवेगळी नांवे ठेवलेली दिसतात.

फार पूर्वी भारतीय लोक या बेटाला ' द्वीप ' असे म्हणत असत. नंतर अरबांनी ज्यावेळीं हे बेट अवलोकन केले. त्यावेळी त्याला ' दिनामगरबी ' असे नाव दिले. पोर्तुगिजांनी आपल्या जहाजाचे ' सेने ' हे नाव त्याला दिले.



' डोडो पक्षी

या बेटावर पूर्वी ' डोडो ' नांवाचा पक्षी होता. आज त्या जातीतील एकही पक्षी जिवंत नाही. फक्त म्युझियममध्ये त्याचा सांगाडा पहावयास सापडतो. या पक्ष्याच्या नावारून या बेटाला " " **डोडो बेट** " असंही नांव होतं.

नंतर आलेल्या ' डच ' लोकांनी या बेटाला प्रथम ' मॉरिशस ' नांव दिले. सुमारे ११५ वर्षे ते येथे राहिले होते. नंतर उंदरांच्या

त्रासाने त्यांनी हे बेट सोडले. त्यानंतर इ. स. १७१५ मध्ये फ्रेंचांनी आपल्या राजाच्या नांवावर हा प्रदेश जिंकला. आणि या प्रदेशाचे नांव 'फ्रान्सचे द्वीप' असे ठेवले. यांची कारकीर्द १८१० पर्यंत होती. भारतीयांच्या मदतीने १८१० साली जेव्हा इंग्रजांनी हा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला त्यावेळी त्यांनी या बेटाला परत 'मॉरिशस' असे नांव दिले. अद्यापही तेच नाव प्रचलीत आहे.

मॉरिशस हे बेट हिन्दी महासागरात आफ्रिकेजवळ आहे. मादागास्करपासून पूर्वेला सुमारे ५०० मैलावर आहे. नेटाल (दक्षिण आफ्रिका) पासून सुमारे १५०० मैल; मुंबईपासून अडीच हजार मैल. कोलंबोपासून बावीसशे मैल तर मेलबॉर्न (ऑस्ट्रेलिया) पासून सुमारे साडेचार हजार मैल आहे. मुंबईहून विमानाने मॉरिशसला जाता येत असून तेथे पोहचण्याकरता साधारपणे साडेपाच तास लागतात. बोटीने सुद्धा आफ्रिकेच्या मार्गाने मॉरिशसला जाता येते. मॉरिशस आणि भारत यांच्या वेळेत दीडतासाचा फरक आहे.

मॉरिशसची दक्षिणोत्तर लांबी ३९ मैल असून, पूर्व-पश्चिम रुंदी २९ मैल आहे. या बेटाचे एकूण क्षेत्रफळ ७१६ चौरस मैल आहे.

या छोटयाशा बेटाची लोकसंख्या आठ लाख आहे. मजूर बनून जे भारतीय पूर्वी मॉरिशसमध्ये गेले, त्यांचे वंशज जवळजवळ शेकडा सदुसष्ट आहेत, हिन्दूंची संख्या त्रेपन्न टक्के असून चिनी पंचवीस हजार, तर युरोपियन सुमारे दहा हजार आहेत. बाकी लोक आफ्रिकी वंशाचे असून त्यांना 'क्रिओल' असं म्हणतात.

हा देश शेतीप्रधान असून वरुणराजाची नेहमीच कृपा असल्याने बारा महिने येथे पिके येतात. या प्रदेशात छोटया छोटया सत्तावीस नद्या असल्याने पाणी मुबलक असते. ऊस, चहा, तंबाखू ही प्रमुख पिके आहेत. हे छोटेसे बेट जगाच्या कित्येक देशांना साखरेचा पुरवठा करू शकते. नाना प्रकारच्या भाज्या, फुलझाडे आपणाला येथे दिसतात. भारतात तयार होणारी केळी, द्राक्षं, फणस, अननस ही फळे येथेही आपणास दिसतात.

भारतातील राघू, मैना, बुलबुल, चिमण्या यांचे आवाजही येथे आपण ऐकू शकतो.

मॉरिशसमधील लोक, त्यांची भाषा, संस्कृती, रूप, समारंभ, वेशभूषा, निसर्ग, पिके या गोष्टी पाहिल्यावर आपण परप्रदेशात आहोत असे वाटतच नाही. भारताच्या एका छोटया भागात वावरल्याचं समाधान आपल्याला तेथे मिळू शकते.

* * *

# २. निसर्ग सुंदर मॉरिशस

भूतलावरील नंदनवन म्हणून गणला गेलेला मॉरिशस हा देश निसर्ग-सौंदर्याच्या बाबतीत अतुलनीय आहे. तेथील निसर्ग मन-मोहक आहे. वर्षभर सतत पडणारा पाऊस, त्यामुळे ठिकठिकाणी लवलवणारी हिरवळ, शेतातून डोलणारे उसाचे फड, आणि डोंगर उतारावर असणारे चहाचे मळे !! चोहीकडे असं हिरव्या रंगाचं साम्राज्य पसरलेलं असतं. रात्रभर पडणारे दवबिंदू साठवून ठेवून सकाळच्या कोवळ्या उन्हात सोन्यासारख्या दिसणाऱ्या भाताच्या लोंब्या पाहिल्या की असं वाटतं– कुबेरानं या शेतांवर सोन्याचा वर्षाव केला आहे.

या हिरवळीच्या साम्राज्यात भर पडते त्या छोट्या छोट्या खळखळ वाहणाऱ्या झऱ्यांची ! साऱ्या परिसरात त्यांचा नाजुक आवाज निसर्गसौंदर्याला संगीताची साथ देत असतो. वर्षभर चाललेल्या ऊन–पावसाच्या खेळात आकाश कधी निळाई धारण करतं तर कधी अभ्रांनी आच्छादून जातं. इंद्रधनुष्यं तर अनेकदा आपल्याला मोहवून टाकतात. इथं मोठमोठाले डोंगर नाहीत. जागोजाग विखुरलेल्या छोट्या छोट्या टेकड्या आहेत. अशा या रमणीय बेटाला वेढलं आहे काळ्या निळ्या सागरानं ! हे सारं पाहिलं की परमेश्वरानं स्वर्गाची निर्मिती याच बेटाच्या रमणी-यतेवरून केलेली असावी असं वाटतं.

हा देश पर्यटकांचाही आवडता बनला आहे. त्यांना आवडणारी जागा म्हणजे काळचा-निळचा पाण्याने अथांग भरलेला समुद्र किनारा ! काठावर जाई-जुईच्या फुलांप्रमाणे पांढरी शुभ्र मऊ मुलायम वाळू पसरलेली असते. थंडगार वाऱ्याच्या हेलकाव्या-बरोबर हेलावणाऱ्या लाटा, काही ठिकाणी मोठाल्या खडकातून पन्नास पन्नास फुटांपर्यंत उंच उडणारी कारंजी, झाडांबरोबर अवखळ मुलाप्रमाणे खेळणारा वारा, आणि जलविहार करताना समुद्राच्या हास्यात आपले हास्य विलीन करणारे लोक पाहिले की, आपणही आनंदीत होतो. मनही अथांग सागरासारखं विशाल होतं आणि असं वाटतं की जीवनातला खरा आनंद लुटायचा असेल तर या समुद्र-किनाऱ्यावरच !

मॉरिशसमध्ये आपण कोठेही असलात तरी आपल्यापासून समुद्र किनारा दहा मैलापेक्षा अधिक लांब असणार नाही. मॉरि-शसला सुमारे शंभर मैल समुद्र किनारा लाभला असून तो धोका-दायक नाही. त्यामुळे माणसांना वर्षभर समुद्रस्नानाचा आस्वाद घेता येतो. जगात जे जे रमणीय समुद्र किनारे आहेत त्यात मॉरिशसचे स्थान मोठे आहे. या बेटाच्या दक्षिणेकडचा समुद्र-किनारा सगळ्यात सुंदर असून कोणीही प्रवासी या सागरतीराचे दर्शन घेतल्याशिवाय परत फिरत नाही.

प्लेजांस विमानतळाजवळ मॉरिशसमधील माहेबर्ग हे जुने गाव समुद्रकिनाऱ्यावर वसले आहे. फ्रान्सचा गव्हर्नर लाबुर्दोने याच्या नावावरून या गावाला हे नाव दिले आहे. हे या बेटाचे मच्छि-मारीचे प्रमुख केंद्र आहे. येथे एक ऐतिहासिक संग्रहालय असून फ्रेंच आणि इंग्रज यांच्यात ग्रां पोर्ट येथे झालेल्या लढाईतील काही

वस्तू स्मारक म्हणून ठेवलेल्या आहेत. या ठिकाणी भूतपूर्व गव्हर्नरांच्या खुर्च्या, पलंग वगैरे इतर गोष्टी ठेवलेल्या आहेत.

सुट्टीतील मजा लुटण्यासाठी माहेबर्गला अनेक लोक येतात. या गावाजवळच 'ब्लू बे' नावाचा सर्वात सुंदर समुद्र किनारा आहे. त्याच्यामुळे माहेबर्गच्या सौंदर्यात भरच पडली आहे. 'ब्लू बे' हा समुद्रकिनारा समुद्रस्नानाकरता प्रसिद्ध आहे. आणि चांगलाही आहे. याच्या जवळच लें चालन्द नावाचा आणखी एक सुरेख समुद्र किनारा असून तेथे पर्यटकांच्यासाठी किंवा प्रवाश्यांसाठी एक अत्याधुनिक हॉटेलही बांधले गेले आहे.

सवाने जिल्ह्याच्या अगदी दक्षिण टोकाला सुयाक हे गाव असून येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय मच्छिमारी हाच आहे. इथला समुद्र किनारा मात्र 'ब्लू बे' किंवा 'ले चालन्द' यासारखा सुरक्षित नसल्याने समुद्रात स्नान करता येत नाही. मोठमोठ्या खडकांच्या रांगा समुद्रात दूरपर्यंत गेलेल्या असून बाराही महिने येथे सोसाट्याचा वारा वाहात असतो. समुद्राच्या उंच उंच लाटा खडकांना धडका देत असतात. त्यामुळे हा समुद्र किनारा असुरक्षित असा आहे. तथापि सृष्टीसौंदर्याच्या दृष्टीने मात्र हा सुंदर आहे. समुद्रात दूरवर गेलेल्या एका मोठ्या खडकाला 'ग्री ग्री' म्हणतात. येथून निसर्गाचे रौद्र स्वरूप सुरेख दिसते. या किनाऱ्याजवळच एक बगीचा पण आहे. सुयाकजवळ रोचेस्टर धबधबाही आपल्या सौंदर्याकरता प्रसिद्ध आहे.

रियांबेल हा मॉरिशसचा आणखी एक समुद्र किनारा. सुयाकच्या अगदी विरुद्ध ! हा किनारा इतका सुरक्षित आहे की, लहान लहान मुले सुद्धा समुद्रात बिनधोकपणे खेळत असतात. रियांबेलपासून जवळच पश्चिमेला बे द्यू केप खाडीत मेकोंदे नावाची एक

प्रचंड शीला आहे. त्या शीलेवरून भोवती नाचणाऱ्या समुद्राचे विलोभनीय दृश्य फारच सुरेख दिसते. हिंदू लोक या शीलेला 'मार्कंडेय शीला' म्हणतात. मार्कंडेय ऋषीने या शीळेवर बसून तपश्चर्या केली होती असा त्यांचा विश्वास आहे.

ब्लॅक रिव्हर जिल्हयात 'तमारिन' नावाचा समुद्र किनाराही पोहण्यासाठी चांगला मानला जातो. पोर्ट लुईजवळ असणारी 'बे द्यू तांबे' नावाची खाडी आहे. हिवाळयात समुद्र-सान्निध्यात वेळ घालवायला ही जागा चांगली समजली जाते. याच्या जवळपास अनेक सुंदर समुद्र किनारे पहायला सापडतील. पोंत ओ पिंमेत मच्छिमारीसाठी प्रसिद्ध आहे तर ट्रो ओ बिश नारळाच्या झाडांसाठी ! या किनाऱ्याजवळच एक सुरेख हिंदू मंदिर आहे. याच्या पुढे असणारा चौईसी समुद्र किनारा ह्या नौकाविहारासाठी प्रसिद्ध आहे.

ग्राँ बे आणि कॅप मालहेरेक्स यामध्ये असणारा पेरीबेरे नावाचा सुरेख समुद्र किनारा आहे. कॅप मालहेरेक्स त्या गावात मासे मारणाऱ्या लोकांचीच संख्या अधिक आहे. ग्रां गाबे नावाच्या गावातही याच लोकांची संख्या अधिक असून मासे मारण्याच्या व्यवसायातील कौशल्याबाबत येथील कोळयांची जगात ख्याती आहे. याशिवाय रोशे नोयरे, फ्लिक आं फ्लैक, बेलमारे हे ही मॉरिशसमधील प्रसिद्ध समुद्र किनारे आहेत.

मॉरिशसमधील समुद्र तट हे असे आहेत. कुठे संथ असणारे समुद्राचे निळे पाणी आकाशाच्या रंगाशी स्पर्धा करताना दिसते, तर कोठे सोसाटयाच्या वाऱ्याने मोठमोठाल्या खडकांना टकरा मारणारे पाणी आपल्या जवळ असणारी हिऱ्या-मोत्यांची दौलत दूरवर उधळताना आढळते. समुद्राची ही शांत आणि रौद्र दोन्ही रूपे

मोहक वाटतात. काही काही ठिकाणी खडकांना छेद गेलेला असतो. भोकं पडलेली असतात आणि त्यातून समुद्राचे पाणी खूप उंच उडताना दिसते. ले सुफ्लेयर या ठिकाणी खडकातून सुमारे पन्नास पन्नास फूट पाणी उंच उडताना, ही सृष्टीने तयार केलेली कारंजी तर नाहीत ना, असे वाटते. या उंचच उंच उडणाऱ्या पाण्यातून ज्यावेळी सूर्य किरण जातात त्यावेळी हजारो इंद्रधनुष्यं चमकताना दिसतात. म्हणूनच मॉरिशसला इंद्रधनुष्यांचा देश म्हणतात.

मच्छिमारी, नौकाविहार आणि सृष्टीसौंदर्य याकरता प्रसिद्ध असणाऱ्या या समुद्र किनाऱ्यावर विविध रंगांचे शिंपले सापडतात. जगात सापडणारे बहुतेक सर्व प्रकारचे शिंपले येथे सापडतात. सकाळचे सूर्याचे किरण ज्यावेळी या विविध रंगांच्या शिंपल्यांवर पडतात तेव्हा पृथ्वीमातेने आपल्या रत्नभांडारातील रत्ने या पांढऱ्या स्वच्छ बाळूत विखरून टाकली आहेत की काय असे वाटते.

मॉरिशसच्या या सौंदर्यात तेथल्या छोटचा छोटचा टेकडचा, नद्या, तलाव, धबधबे, झरे यांनीही भर घातली आहे. तेथील तलावात प्रसिद्ध असणारा तलाव म्हणजे 'परीतलाव.' या परि-तलावाबद्दल एक गमतीदार लोककथा तेथे प्रचलित आहे.

फार वर्षापूर्वीची गोष्ट. फ्रेंचांचं राज्य होतं त्यावेळी तलाव सुकला होता. कधी पाण्यानं तो भरलाच नाही. असं कां ? याचं उत्तंर कोणालाच माहीत नव्हतं. तलावाच्या काठी एक फ्रेंच अधिकाऱ्याचं मक्याचं खूप मोठं शेत होतं. हिरवं गार. कणसांनी डोलणारं. शेताची राखण कारयला त्याने एक रखवालदार ठेवला होता. मोठा प्रामाणिक आणि स्वामीभक्त होता. त्याचं जेवण रोज शेतावरच येत असे. आनंदात तो तेथे रहात असे.

काल फिरला; आणि एके दिवशी त्याचं जेवण आलं नाही.


त्या दिवशी त्याला उपवास घडला. दुसऱ्या दिवशी त्याने उत्कंठेने वाट पाहिली पण दुसऱ्या दिवशीही जेवण आलं नाही. दोन-चार दिवस झाले, जेवण आलं नाही. एके दिवशी तो भुकेने व्याकूळ होऊन आपल्या झोपडीत बसला असता त्याची नजर समोरच्या कणसांवर गेली. त्याला एक कल्पना सुचली. "जेवण नाही तर नाही ही कणसं आहेत की! यावर आपली उपजीविका करू." त्यानं त्याप्रमाणं केलं.

एक आठवड्यानंतर मालक आला आणि त्याने पाहिलं की बरीचशी मक्याची कणसं कोणी तरी नेलेली दिसतात. त्यानं चौकशी केली. रखवालदारानं खरी हकीगत सांगताच त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याने त्याचे दात पाडण्याचा हुकूम दिला. बिचाऱ्याचे सगळे दात पाडले गेले. रक्ताळलेल्या तोंडाने, जखमांच्या असह्य वेदनांनी तडफडत असताना मालकाने त्याला त्या सुकलेल्या तलावात फेकून दिलं.

दिवस संपला. रात्र झाली तरी त्याच्या वेदना कमी होत नव्हत्या. रात्री त्याचा डोळा कधी लागला हे त्यालाही कळले नाही. त्याला जाग आली ती स्वर्गीय संगीताने. पायातील नूपुरांच्या मंजुळ आवाजाने. त्याने पाहिले स्वर्गातल्या काही अप्सरा तलावाकाठी नाचत, गात तेथे आल्या होत्या. अप्सरांनी रखवालदाराला त्याच्या या स्थितीबद्दल विचारलं. त्याची हकीकत ऐकून त्यांना वाईट वाटलं त्यांनी सांगितलं "काही वेळातच तुला पूर्वीपेक्षाही अधिक सुंदर दात येतील; आणि तुझ्या अश्रूंनी हा तलाव पूर्ण भरून जाईल. यातील पाणी कधीच आटणार नाही. कालान्तराने पूर्वेकडून काही लोक येतील ते यातील पाणी पवित्र मानतील. ह्या पाण्याने आपल्या इष्ट देवतेचे पूजन करतील."

अप्सरांची-पऱ्यांची वाणी खरी झाली. तलाव पाण्याने तुडुंब भरला. त्याचं पाणी कधीच आटत नाही. कालान्तराने भारतीय लोक येथे आले. असं सांगतात की, त्रियोले नावाच्या गावात रहाणाऱ्या माणसाला दृष्टांत झाला की, "या तलावातील पाणी अत्यंत पवित्र असून सर्व हिंदूंनी शिवरात्रीच्या दिवशी शंकराचा अभिषेक या पाण्याने करावा." त्या दिवसापासून आज तागायत शिवरात्रीच्या दिवशी गावोगावच्या शंकराला 'परी तलावाच्या' पाण्यानें अभिषेक होत असतो.

शिवरात्रीच्या आधी दोन दिवस हजारो हिंदू पांढरे स्वच्छ धोतर, शर्ट आणि टोपी घालून परी तलावावर जातात. हातात



परितलावाजवळील शिवमंदिर

कावडी असतात. या कावडी आधी आठ दिवसापासूनच वेगवेगळ्या प्रकाराने शृंगारलेल्या असतात. रात्री भजनाचा कार्यक्रम असतो. शिवरात्रीच्या दिवशी समारंभपूर्वक मिरवणूक काढतात. त्याचे नेतृत्त्व

सध्याचे त्यांचे महामंत्री डॉ. रामगुलाम हे करतात. शिवरात्रीच्या दिवशी हे सारे यात्रिक आपल्या जवळ असणाऱ्या भांड्यातून किंवा कावडीतून परी तलावाचे पाणी घेऊन आपापल्या गावी जातात. आपल्या गावातील शंकराची पूजा या पवित्र पाण्याने करतात. आपल्याकडे गंगेच्या पाण्याला जी पवित्रता आहे तीच मॉरिशसमध्ये परीतलातील पाण्याला आहे.

या तलावात एक जलराक्षस रहात आहे, अशीही एक समजूत बरेच दिवस तेथे होती. त्या भागात रहाणारे लोक 'आपल्या डोळ्यांनी आम्ही जलराक्षस पाहिला आहे.' असे सांगत असत.

असंही सांगतात की, काही गुलाम आपल्या मालकाला भिऊन पळत होते. मालक त्यांचा पाठलाग करीत होते. गुलाम परीतलावाजवळ येताच आपला जीव वाचवण्यासाठी त्यांनी परीतलावात उड्या मारल्या. त्यांच्या पाठोपाठ मालकही तेथे आला. तो तेथे येताच जलराक्षसाने आपले आक्राळ विक्राळ रूप प्रगट केले. ते पाहून तो मालक पळून गेला.

१८३० साली एका इंजिनियराने या तलावाची पहाणी केली. हा तलाव फार खोल नाही असा निष्कर्षही त्याने काढला. ही पहाणी करताना त्याला मात्र हा जलराक्षस दिसला नाही.

क्यूर्पिप शहराजवळ असणारा 'पितो द्यू मिलो' नावाचा तलाव आपल्या सृष्टिसौंदर्याकरता प्रसिद्ध आहे. 'ला निकोलियर' हा आणखी एक मोठा तलाव ! सुमारे सव्वादोनशे एकरात याचे पाणी पसरलेले आहे. समुद्रसपाटीपासून आठशे फूट उंचीवर असणाऱ्या या तलावाचे पाणी शुद्ध करून पिण्याकरता वापरतात. 'मार ओ वाक्वा' हा तलाव समुद्रसपाटीपासून सुमारे दोन हजार फूट उंच असून याचे पाणीही पिण्याकरता वापरतात. या

तलावाजवळच असणाऱ्या ‘मार लांग’ या तलावाचे पाणी जलसिंचन आणि विजेच्या उत्पादनासाठी वापरले जाते. ‘ओ ब्लू’ हा जलाशयही महत्त्वपूर्ण आहे. अशा तऱ्हेने समुद्रकिनाऱ्याबरोबर मॉरिशसच्या सौंदर्यात या जलाशयांचाही वाटा आहे.

सगळीकडे छोटया छोटया टेकडया विखुरलेल्या असल्या तरी डोंगरांची काही शिखरे उंच असून वैशिष्टयपूर्णही आहेत. माणसाच्या आकाराचे दिसणारे ‘पिटर बोथ’ हे एक शिखर आहे. ह्या शिखराबद्दलही अशीच गमतीदार कथा सांगतात.

पोर्ट लुई या शहराच्या उत्तर–पश्चिम अशी एक डोंगरांची ओळ आहे. त्याला ‘मोका’ असं म्हणतात. या डोंगरमालिकेत ‘पिटर बोथ’ नावाचे एक उंच शिखर आहे. तें सुमारे अडीच हजार फूट उंच आहे. या डोंगराचे शिखर माणसाच्या डोक्याच्या आकाराचे आहे. लांबून पहाणाऱ्याला मात्र ती मनुष्याकृतीच वाटते. डोके, गळा, खांदा, वगैरे मानवी आकृतीचे भाग स्पष्ट दिसतात.

पिटर बोथ हा डच अधिकारी होता आणि सतराव्या शतकात मॉरिशसला येताना त्याचे जहाज वादळात सापडले आणि मोडून गेले. त्याच्या स्मरणार्थ या डोंगराला त्याचे नाव दिले गेले. आता हा डोंगर मनुष्याकृती दिसतो ही निसर्गाची देणगी! पण मॉरिशसच्या लोकांनी ह्या मनुष्याकृती दिसणाऱ्या शिखरासंबंधीही एक कथा रूढ केलेली आहे.

स्यन्तक नावाचा एक गवळी होता. या डोंगराजवळच त्याचे गाव होते. रोज दूध घालण्याकरता या डोंगराच्या रस्त्यावरूनच त्याला जावे लागत असे. बिचारा गरीब होता. दिवसभर दूध विक्री करावी आणि संध्याकाळी जे चार पैसे मिळतील त्यावर



पीटर बीथ शिखर

आपली आणि आपल्या वृद्ध मातापित्यांची गुजराण करावी असा त्याचा क्रम असे.

एके दिवशी दूध विकता विकता हा खूप दूर गेला. जेव्हा परत यायला निघाला तेव्हा रात्र पडू लागली होती. कसाबसा तो या डोंगराच्या चढणीवर असलेल्या एका तलावापाशी आला. दिवसभराच्या परिश्रमाने बिचारा फार थकला होता. त्याला वाटलं आपण येथेच विश्रांती घ्यावी. रात्र बरीच दाटली होती. आकाशात तारे चमकत होते. हा तेथेच लवंडला. त्याला गाढ झोप लागली.

मध्यरात्रीच्या सुमारास सुगंधी वारा आणि दिव्य प्रकाशामुळे त्याने डोळे उघडले तो त्याचे डोळे दिपून गेले. त्याने समोर पाहिले; अप्सरांचे स्वर्गीय नाच-गाणे चालले होते. ते पहाताना त्याचे भान हरपले. पण एकाएकी ते नाचगाणे बंद पडले आणि त्या अप्सरा त्याच्याकडे आल्या. गरीब गवळी भीतीने थरथर कापू लागला. आता आपली धडगत नाही हे त्याने मनोमनी जाणले आणि त्यांनी विचारल्यावरून अत्यंत दीणवाणीने त्याने आपली सारी हकीगत त्यांना सांगितली. त्याच्या गरिबीची त्यांना दया आली. त्यांनी ‘रोज आमचे नाच-गाणे पहायला येत जा’ असे त्याला सांगितले. पण ‘जर ही गोष्ट तू कोणालाही सांगितलीस तर तू तत्क्षणी दगड होऊन पडशील’ असेही त्याला बजावले. स्यन्तकनेही त्यांना तसे वचन दिले.

या प्रसंगानंतर त्याची परिस्थिती सुधारू लागली. तो आपले काम लवकर आटपत असे आणि रात्री अप्सरांचे गाणे ऐकून आनंद लुटीत असे. पण ही गोष्ट गुप्त किती दिवस रहाणार ? लवकरच साऱ्या गावाला बातमी समजली की, ‘स्यन्तक रात्री आपल्या घरी येत नाही’ त्याच्या आईवडिलांनी, मित्रांनी अनेक प्रकारे

मॉ...२

'तू रात्री कोठे असतोस' असे विचारले. पण "तू ही गोष्ट कोणालाही सांगितलीस तर दगड होऊन पडशील" या भीतीने त्याने ही गोष्ट कोणालाही सांगितली नाही. यावर काही तरी इलाज केला पाहिजे. म्हणून त्याच्या आई-वडिलांनी शेजारच्या गावातील एका मुलीबरोबर त्याचे लग्न ठरविले. लग्नाला जात असताना, रात्र झाली म्हणून, सर्व वऱ्हाडी या डोंगरावर मुक्कामाला थांबले.

रात्री गप्पा मारता मारता स्यन्तकच्या मित्रांनी ही गोष्ट काढली आणि खोदून खोदून विचारले की, 'तू रात्री कोठे जात असतोस ?' स्यन्तकचा नाईलाज झाला. त्याने विचार केला की, "अप्सरांची आणि आपली आता मैत्री झालेली आहे. तेव्हा यांना ही गोष्ट सांगितली तरी त्या रागवणार नाहीत. आपण त्यांची समजूत घालू." म्हणून त्याने ही गोष्ट त्यांना सविस्तर सांगायला सुरुवात केली आणि काही भाग सांगून होतो न होतो तोच, तो दगड होऊन पडला. तो पर्वत एकदम उंच झाला आणि त्याला मनुष्याकृती आकार आला. असं म्हणतात की आजही स्यन्तक आपल्या अपराधाचे प्रायश्चित्त घेत 'मुडिया डोंगरा'वर बसला आहे.

मोका डोंगरांच्या ओळीत 'पाउस' नावाचे आणखी एक शिखर असून त्याची उंची सुमारे पावणेतीन हजार फूट आहे. 'पाउस' या शब्दाचा अर्थ अंगठा असा आहे. हे शिखर अंगठ्यासारखे दिसत असल्याने त्याला हे नाव मिळालेले असावे.

मॉरिशसमध्ये निसर्गाचा आणखी एक चमत्कार म्हणजे 'समारेल' डोंगर ! या डोंगरावर सात रंगाची माती पहायला मिळते. जगांत एकाच ठिकाणी एवढ्या विविध प्रकारची माती अन्यत्र

कोठेही सापडत नाही. या डोंगरावरील माती सप्तरंगी कशी झाली याबद्दलही एक गमतीदार कथा रूढ आहे.

एकदा काय झालं, सूर्य आपल्या रोजच्या कामाने थकला. त्याला विश्रांतीची जरूर भासू लागली ! पण विश्रांती घेणार कोठे ? जेथे सजीव सृष्टी आहे तेथे विश्रांती घेणे शक्यच नव्हते; उष्णतेने प्राणी जळून खाक झाले असते. त्याने नारदाला सांगितले की, " नारदा, काही दिवस मला विश्रांती घ्यायची आहे. त्याकरता अशी जागा शोधून काढ की जी दिसायला अतिशय सुंदर असेल, जिथे मन प्रसन्न राहील पण जेथे कोणीही सजीव प्राणी नसेल." सूर्य-देवाची आज्ञा ऐकून नारद जागा शोधायला बाहेर पडले. पाहता पाहता त्यांना मॉरिशसमधील 'समारेल' डोंगर फारच सुंदर वाटला आणि शिवाय त्यावेळी तेथे कोणतीही जीवसृष्टीही नव्हती. सूर्यदेवाने सांगितल्याप्रमाणे जागा सापडताच नारद सूर्याकडे गेले आणि त्यांनी ही जागा सांगितली. सूर्य आपल्या सात घोड्यांच्या रथातून येऊन, विश्रांतीसाठी काही दिवस येथे राहिले होते. या डोंगराला त्या सातही घोड्यांचे खूर लागले असल्याने येथील जमीन सप्तरंगी झाली असल्याचे सांगतात.

समारेलवर दिसणाऱ्या या रंगीत मातीकडे बारकाईने पाहिल्यास यात आणखीही काही रंगांच्या छटा दिसून येतात. एकाच ठिकाणी एवढ्या विविध रंगांची माती सापडणारे असे जगात एकही ठिकाण नाही. ज्वालामुखीच्या विस्फोटाने हा प्रदेश निर्माण झाल्यानें नैसर्गिक चमत्काराच्यामुळे हे रंग येथे दिसतात. शास्त्रज्ञांच्या मते याच्या अंतर्भागात हिरे असावेत; पण प्रत्यक्षतः मात्र तेथे संशोधन झालेले नाही.

समारेल या डोंगराची चढण काजन्वायाल नावाच्या गावापासून सुरू होते. सडक गोलाकार होत होत डोंगर माथ्यावर जाते. रस्त्याने जाताना कित्येकदा हरणांचे कळप दिसतात तर काही ठिकाणी ऊन खाणारी माकडं भेटतात. चढणीनंतर एक पूल लागतो. या पुलावरून खाली पाहिलं असता निसर्गसौंदर्याचा साक्षात्कार होतो. डोंगर सगळा हिरवागार आहे. पुढे त्यातून वाहणारा एक झरा पण आहे. त्याचं पाणी लांबून अगदी दुधासारखं पांढरं स्वच्छ दिसतं. या डोंगराचा आणखी एक विशेष म्हणजे सगळीकडे हिरवळीचे अवगुंठन घेणाऱ्या ह्या डोंगरावर जिथे सप्तरंगी माती आहे तेथे मात्र गवताचे एक पातेही उगवत नाही. तेथे दिसते फक्त विविध रंगांची माती.

मॉरिशसमध्ये जी उद्याने आहेत त्यापैकी पाम्प्लेमुस नावाचे उद्यान अतिशय मनोहर आणि सुंदर आहे. पोर्टलुईपासून सात मैलावर ही बाग आहे. फ्रान्सचा मॉरिशसमधील राज्यपाल लाबुर्दोने याने १७३५ मध्ये सुमारे सत्तावन्न एकर जमीन विकत घेतली होती. त्यात त्याने राहण्यासाठी एक मोठी आणि सुरेख इमारतही बांधली होती. त्या घराचे नाव त्याने मॉन प्लेझर (सुखाची भावना) असे ठेवले होते.

तीस वर्षांनंतर पियेर पुआव्र या फ्रेंच अधिकाऱ्याने तेथे सुंदर बाग तयार केली. त्याने अनेक देशातून अनेक प्रकारची झाडे आणून या बागेत लावली. वेगवेगळ्या प्रकारचे ताडवृक्ष या बागेत आहेत. उद्यानाच्या रस्त्यावर दोन्ही बाजूला घनदाट छाया देणारे विशाल वृक्ष आहेत. या उद्यानांत जगातले एक विचित्र झाड पहायला सापडते. 'टाली पोट पाम' (Talipot Palm) हे त्या

झाडाचे नाव ! शंभर वर्षाने एकदा यावर फूल उमलते आणि फूल उमलल्यानंतर हे झाड लगेच सुकून नाहीसे होते.

लोखंडाच्या टोकदार सळयांच्या साहाय्याने केलेले या बागेचे प्रवेशद्वार सुरेख आहे. आत जाताच झाडांच्या लवलवणाऱ्या फांद्या आणि पाखरांचा मंजुळ ध्वनी तुमचे स्वागत करील. समोरच लियेनार स्मारक आहे. त्यावर या उद्यानात लावण्याकरता ज्यांनी विविध झाडे मागवली त्यांची नावे आहेत.

ही बाग पाहिल्याशिवाय प्रवासी परत जात नाहीत. अनेक मोठमोठ्या लोकांनीही या बागेला भेट दिली आहे. त्यांनीही काही झाडे येथे लावली आहेत. क्वीन मेरीने या बागेत पाम्ह वृक्ष लावला होता, तर राजकुमारी मॉर्गरिटनेही एक फुलांचे झाड येथे लावले होते. त्याचे नाव ' फुलांची राणी ' असे आहे. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी ज्यावेळी मॉरिशसला भेट दिली त्यावेळी त्यांनीही या बागेस भेट दिली होती व तेथे एक वृक्ष लावला होता.

या बागेतील घनदाट छाया देणारे वृक्ष, फुलांनी डवरलेल्या वेली, स्वच्छ पाण्यांची सरोवरे, त्यात हसणारी कमळे आणि त्यांची हिरवीगार पाने, मोहक नाजुक हसणाऱ्या कलिका, मखमली हिरवळ आणि सरोवरांतून मनसोक्त विहार करणारे लाल, काळे, तपकीरी मासे कोणत्याही प्रवाशाचे मन आकर्षित करून घेतात यात शंकाच नाही.

मॉरिशसचे निसर्गसौंदर्य हे असे आहे. निसर्गाने आपल्या सौंदर्याची इतक्या मुक्त हस्ताने उधळण अन्यत्र क्वचितच केली असेल. या सृष्टीसौंदर्याने, मॉरिशसला दिलेले ' भू-तलावरचे नंदनवन ' हे नाव सार्थ आहे याचीच प्रचीती येते.

* * *

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
20843 दि: 1-4-1987
465 30/3/84

# ३. शहरे

मॉरिशस हा एक अगदी छोटा देश. केवळ ७१६ चौरस मैलांचा आणि नऊ जिल्हयांचा ! यात मोठाली अशी शहरे असणार ती किती ? मोठी पाच शहरे आहेत. काही शहरे तर एकमेकांच्या इतकी जवळ आहेत की एक शहर संपते कोठे आणि नवीन कोठे सुरू होतें हेमुळी कळतही नाही. संपूर्ण देशाची वस्ती केवळ आठ लाख आहे म्हणजे पुणे या शहरापेक्षाही कमी. अशा या छोटघाशा देशातील शहरांची किंवा प्रमुख ठिकाणांची ही ओळख.

या बेटाचा आकार अगदी लहान असल्याने बसने किंवा टॅक्सीने एका दिवसात संपूर्ण देशाला फेरी मारता येतें. काही वर्षापूर्वी येथे रेल्वे होती पण जाणकारांना वाटलं की या लहानश्या बेटाला रेल्वेची काहीच आवश्यकता नाही. आणि मग रेल्वे संपुष्टात आली. आज येथला सगळा प्रवास मोटारींनी चालतो. सडका अतिशय सुरेख आणि रुंद आहेत. संपूर्ण देशात सडकांचे जाळे विणलेले आहे. बसेसच्या सोयी पुष्कळ असून प्रवास स्वस्तही आहे. आपल्या देशापेक्षा टॅक्सीजही स्वस्त आहेत. एकंदरीत सारा प्रवास बसवर अवलंबून असून तो अधिक सोयीचा आहे.

मॉरिशसमधील सर्वात मोठे शहर म्हणजे 'पोर्ट लुई'. हे शहर मॉरिशसची राजधानी असून ते सर्वात जुनेही आहे. फ्रेंचांच्या

राजवटीत या शहराची स्थापना अठराव्या शतकात झाली. मॉरिशसमधील त्यावेळचा गव्हर्नर माहे द लाबुर्दोने याने याकामी पुढाकार घेऊन हे शहर वसविले; आणि फ्रान्सचा राजा चौदावा लुई याच्या नावावरून या शहराला ‘ पोर्ट लुई ’ हे नांव त्याने दिले.

अर्धवर्तुळाकृती डोंगरांनी घेरलेलं हे शहर मॉरिशसच्या उद्योग आणि व्यापाराचे प्रमुख केंद्र आहे. या शहराचे एकूण क्षेत्रफळ सोळा चौरस मैल असून याची लोकसंख्या सुमारे दीड लाख आहे. या विभागाचे हे एक महत्त्वाचे बंदरही आहे. म्हणून मॉरिशसचे औद्योगिक दृष्टयाही हे प्रमुख केंद्र आहे.

पोर्टलुई या शहराला ऐतिहासिक महत्त्वही आहे. या शहराचा निर्माता माहे द लाबुर्दोने हा १७३५ मध्ये मॉरिशसमध्ये आला होता. त्याने भारतीय इंजिनियरांच्या मदतीने पोर्टलुई ह्या शहराचीं आणि बंदराची रचना केली. याच बंदरातून हा फ्रेंच गव्हर्नर इंग्रजांशी लढण्यासाठी भारताला गेला होता. अठराव्या शतकापासूनच हे व्यापाराचे प्रमुख केंद्र मानले गेले असून तेथून कापूस, कॉफी तसेच अन्य वस्तू फ्रान्सला निर्यात होत होत्या. हे बंदर छोटे असले तरी पूर्ण विकसित असून जगात जी चांगली बंदरे आहेत त्यापैकी हे एक चांगले बंदर आहे.

या शहरात भारतीय, चिनी, फ्रेंच आणि इंग्लिश या संस्कृतींचा संगम झालेला दिसेल. रस्त्यावर फ्रेंच नावे दिसतात. अठराव्या शतकातले एक लहानसे थिएटर, पोप होनेसी रस्त्यावरची सुंदर आकर्षक लाकडी घरे फ्रेंच संस्कृतीची साक्ष देतात. या शहराचा कारभार शंभर वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या नगर पालिकेमार्फत केला जातो. नगरपालिकेची इमारत भव्य, विशाल आणि आधुनिक आहे. त्या इमारतीजवळ सचिवालयाची प्राचीन

भव्य इमारत असून त्याच्या मागील बाजूस लोकसभेची नवीन इमारत तयार झाली आहे.

बाजारात भारतीय आणि चिनी लोकांची दुकाने दिसतील. जुन्या म्युनिसिपल बाजारात चोहीकडे भारतीय, चिनी, क्रिओली लोकांची भाजी, फळफळावळ व अन्य वस्तूंची दुकाने आढळतात.


शहरांत ' कॅम्प द मार्स ' हे मोठे मैदान आहे. फ्रेंच राजवटीत लाबुर्दोनेच्या काळात या मैदानात त्याचे शिपाई कवायत करीत असत. आज मात्र तेथे घोडदौड होत असते. मॉरिशसमध्ये घोडदौड फार पूर्वीपासून मनोरंजन करण्याचा एक प्रकार आहे. या मैदानात इंग्लंडजा राजा सातवा एडवर्ड याची भव्य प्रतिमाही आपल्याला पाहायला मिळते.

या मैदानाच्या जवळच्या टेकडीवर एडिलेड किल्ला असून चौथा विल्यम याने हा बांधला आहे. यावरून शहर आणि बंदराची शोभा विलोभनीय दिसते.

या मैदानाजवळच आर्य सभेचीही इमारत आहे. त्याजवळ भारतीय प्रवास शताब्दिनिमित्त बनवलेले स्मारकही आहे. हा समारंभ १९३५ साली साजरा झाला. १८३५ सालापासून भारतीय लोक या बेटात यायला लागले होते. या आर्य-सभेच्या इमारतीतच डी. ए. वी. कॉलेज चालवले जाते.

आर्यसभेपासून एक फर्लांगाच्या अंतरावर विष्णूचे एक मंदिर असून ते खूप जुने आहे. शहरात एक मशीद आणि एक चिनी पगोडा पण आहे. फ्रेंच गव्हर्नर लाबुर्दोनेच्या पत्नीचे जेथे दफन झाले तो ' संत लुइ गिरीजाघर 'ची इमारतही पाहण्यासारखी आहे. याच शहरात मीनाक्षी मंदीरही पाहण्यासारखे आहे. शहरामध्ये प्रसिद्ध लोकांच्या पुतळ्यांची कमतरता नाही त्यामुळे शहराच्या

सौंदर्यात भर पडली आहे. ' कम्पनी ' बागेत अनेक राजकारणी आणि साहित्यिकांचे पुतळे आहेत. रोमन कॅथॉलिक पाद्री डॉ. पेर लावाल यांचा पुतळाही या शहरात आहे. हे गृहस्थ थोर समाज-सेवक होते. १८५४ साली ज्यावेळी महामारीने लोक हैराण झाले होते त्यावेळी पेर लावाल यांनी रात्रंदिवस कष्ट सोसून लोकांची सेवा केली. त्यांचा पुतळा हे त्या सेवेच्या कृतज्ञतेचे प्रतीक आहे.



मॉरिसमधील मीनाक्षी मंदिर

सर विल्यम न्यूटन स्ट्रीटवर प्राचीन ग्रंथांचे संग्रहालय आहे. या संग्रहालयात मॉरिशससंबंधी जुने दस्ताऐवज, नकाशे या गोष्टी जपून ठेवलेल्या आहेत. इमारत शंभर वर्षांपूर्वीची असून त्याचा एक भाग फ्रेंचांनी ज्यावेळी येथे वास्तव्य करायला सुरुवात केली त्यावेळी तयार झाला आहे.

पोर्टलुई शहराच्या पूर्वेच्या बाजूस पर्वतांच्या रांगा आहेत आणि त्या रांगा संपताच मोका जिल्हा लागतो. हा पठारी प्रदेश

आहे. या जिल्ह्याचे हवामान थंड आहे. प्रारंभापासूनच गव्हर्नरांनी आपल्या निवासस्थानासाठी या जिल्ह्याची निवड केली होती. या जिल्ह्यात आपल्याला शहरे दिसणार नाहीत. या जिल्ह्यात इकडे तिकडे विखुरलेली खेडी आहेत आणि भोवताली आहेत उसाची लांबच लांब पसरलेली हिरवी गार शेते !

या जिल्ह्याच्या पश्चिमेला 'प्लेन्स विल्हेम्स' हा जिल्हा असून या जिल्ह्यात मॉरिशसमधील पाचपैकी चार शहरे आहेत. या जिल्ह्यातील शहरे एकमेकापासून अगदी जवळ आहेत. बेवांसा आणि रोज हिल या दोन गावांना मिळून शहराचा दर्जा दिला आहे. या दोन्ही गावांची लोकसंख्या सुमारे सत्तर हजार आहे. दोन्ही गावांचा कारभार रोजहिलची नगरपालिकाच चालवते. रोजहिल येथे प्लाझा थिएटर असून मॉरिशसचे बहुतेक सांस्कृतिक-कार्यक्रम या थिएटरातच होतात. याच इमारतीत नगरपरिषदेचे कार्यालय असून या थिएटराजवळच क्वीन एलिझाबेथ हे मुलींचे कॉलेज आहे. मुलींच्याकरता निघालेले हे पहिले सरकारी कॉलेज होय.

बेवांसा शहराच्या जवळच नदी किनाऱ्यावर बेलफोर हे उद्यान आहे. उंच उंच घनदाट झाडांच्या गर्दीत लपलेला सोरेज नावाचा एक धबधबाही मुख्य रस्त्यापासून आतल्या बाजूला आहे. 'रोजहिल' या शहराला हे नाव का पडलें या संबंधीची माहितीही मनोरंजक आहे. या शहराच्या मागच्या बाजूला कोर द गार्द नावाचा एक मोठा डोंगर आहे. मावळत्या सूर्याची किरणे जेव्हा या डोंगरावर पडतात तेव्हा गुलाबाच्या फुलाप्रमाणे हा लाल दिसतो. त्यावरून या शहराला रोजहिल हे नाव पडले आहे.

या शहरापासून आपण क्यूरपिप या शहराकडे जात असताना

क्वात्रे बोन आणि वाक्वा ही आणखी दोन मोठी शहरे आपल्याला आढळतील. पोर्टलुई हे शहर समुद्र किनारी असल्याने तेथील हवामान दमट आहे. फार उष्णही नाही आणि फार थंडही नाही. पण या शहरांच्याकडे जसजसे आपण जातो तसतशी, समुद्र सपाटीपासून उंची वाढत असल्याने हवामान थंड होत गेलेलें दिसते. क्वात्रे बोन हे एक छोटेसे शहर असून त्याची लोकसंख्या चाळीस हजार आहे. वाक्वा याला नुकताच शहराचा दर्जा देण्यात आला असून त्याची लोकसंख्या सुमारे पंचेचाळीस हजार आहे. फ्रेंच भाषेत वाक्वा, हे एका विशिष्ट प्रकारच्या उंच झाडाचे नाव आहे. ही झाडें येथे पुष्कळ असून यामुळे या शहराला वाक्वा हे नाव पडलेलें आहें. रोजहिल या शहरात मॉरिशसचे सांस्कृतिक कार्यक्रम जास्त होतात. त्याकरताच ते शहर प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणे वाक्वा हे शहर मॉरिशसमधील क्रीडे करता प्रसिद्ध आहे. खेळांची मोठमोठी मैदाने आपल्याला येथे दिसतील. फूटबॉल हा त्यांचा आवडता खेळ. त्या बरोबरच गोल्फ, टेनिस हे खेंळही खेळले जातात. या शहराजवळच फिनिक्स नावाचेही आणखी एक छोटे शहर आहे. त्याचा समावेशही या शहरांतर्गतच होतो.

क्यूर्पिप ह्या शहराला मॉरिशसचे काश्मीर म्हणतात. या जिल्ह्यातील सर्वांत उंचावर वसलेले हे शहर असून यात्री लोकसंख्या सुमारे पन्नास हजार आहे. जुन्या पद्धतीचे युरोपीय बंगले आणि आधुनिक बंगले यांचे मिश्रण या शहरात झालेले दिसते. सगळीकडे हिरवळ पसरलेली असून बंगल्यांच्या समोरील प्रशस्त बागाही आपले मन आकर्षून घेतील. फार वर्षांपूर्वी हे दलदलीत वसलेले एक छोटे गाव होते, याची नावनिशाणीही आज आपल्याला येथें दिसणार नाही.

क्यूर्पिपमध्ये पुष्कळ कॉलेजस् आहेत. पूर्वी पोर्ट लुईमध्ये असणारे रॉयल कॉलेज तेथून क्यूर्पिपमध्ये आणले गेले आहे. पहिल्या महायुद्धात मॉरिशसच्या ज्या लोकांनी आपला देह ठेवला त्यांच्या स्मरणार्थं एक स्मारक उभारले असून ते रॉयल कॉलेजच्या समोर आहे. येथील टाऊनहॉल जुन्या फ्रेंच पद्धतीचा आहे तर नगरपालिकेची इमारत अगदी आधुनिक पद्धतीची आहे. टाऊन हॉलला लागून एक सार्वजनिक ग्रंथालय आहे. शहरात एक बोटॅनिकल गार्डन पण आहे. या शहरात युरोपियन लोक जास्त रहात असल्याने बाजार वा अन्य ठिकाणे यावर त्यांच्या संस्कृतीची छाप पडलेली दिसते.

या शहरात एक मोठा ज्वालामुखी आहे. खूप उंचावर असणारा हा ज्वालामुखी आता निद्रिस्त असल्याने त्यापासून धोका नाही. मॉरिशसला सध्या एकच मोठा धोका आहे आणि तो म्हणजे वादळाचा ! येथे फार मोठी वादळे नेहमी येतात. त्यात घरे दारे, झाडे जमीनदोस्त होतात, सर्व जीवन विस्कळीत होते. तथापि आता आधुनिक पद्धतीची पक्की घरे बांधल्याने हा धोका पुष्कळच कमी झाला आहे.

क्वात्रे बोन शहराच्या पश्चिमेला अेक पर्वत-शृंखला असून तिला ‘ब्लॅक रिव्हर’ असं नाव आहे. त्याच्या पायथ्याशी ब्लॅक रिव्हर हा जिल्हा आहे. मोका जिल्हयाप्रमाणेच येथे एक चिनी मिल आहे. दक्षिणेकडे खूप मोठे मैदान आहे. हे मैदान चारही बाजूंनी डोंगरांनी घेरलेले आहे. यात आणखी दोन जिल्हे आहेत. पश्चिमेला सवाने आणि पूर्वेला ग्राँ पोर्ट. हे दोन्ही जिल्हे उसाच्या शेतीकरता अत्यंत उपयुक्त आहेत. या दोन जिल्हयात दहा

साखर कारखाने आहेत. सवाने जिल्ह्यात चहाही होतो आणि चहाचेही जास्त कारखाने याच भागात आहेत. ग्राँ पोर्ट जिल्ह्यात मॉरिशसचे एकमात्र विमानतळ प्लेजांस आहे. त्याच्याजवळच माहेबर्ग हे गाव आहे. ग्राँ पोर्टच्या उत्तरेला फ्लेक जिल्हा असून उत्तरेला रिव्हर दि राम्पा आणि पॉम्प्लेमूस हे दोन जिल्हे आहेत.

मॉरिशसमधले जिल्हे आणि शहरे ही याप्रमाणे आहेत. सबंध देशात आपल्याला उसाची शेते दिसतील. गाव किंवा शहरे संपली की लांबच लांब पसरलेली उसाची शेते दिसतात. गाव आणि शहरे यात बुडून जातात. शहरं असली तरी शांत वाटतात. नाही म्हणायला पोर्ट लुई इथे मात्र सगळीकडे घाई गर्दी जास्त जाणवते. क्यूर्पिप अत्यंत आधुनिक असल्याने सर्व प्रकारच्या नव्या फॅशन्स येथे पहावयास मिळतात. अशा तऱ्हेने या छोटया देशाची छोटी शहरे आपापल्या वैशिष्टचांनी सजली आहेत. आपापल्या परीनं देशाच्या सौंदर्यात भर घालीत आहेत.

* * *

# ४. मॉरिशसचा इतिहास (पूर्वार्ध)

मॉरिशसमधील शहरे, प्रसिद्ध ठिकाणे पाहिल्यानंतर तेथील इतिहासावर एक दृष्टीक्षेप टाकणेही आवश्यक आहे. आपल्या भारताला खूप जुना इतिहास लाभला आहे. त्या मानाने मॉरिशसचा इतिहास हा चार–पाचशे वर्षांपासूनचा आहे. पाचशे वर्षांपूर्वी तेथे मनुष्य वस्ती नव्हती. तो एक निर्जन भाग होता.

जुन्या भारतीय लोकांना या बेटाची माहिती असावी असे वाटते. 'श्वेत द्वीप' असा याचा उल्लेख आढळतो. पं. सातवळेकर यांच्या 'वेद परिचय' या ग्रंथात हा उल्लेख आढळतो. या बेटावर सर्वात आधी वस्ती कोणी केली हे सांगता येणं कठीण आहे. तथापि इसवी सनापूर्वी सुमारे पांचशे वर्षे फिनिशियन लोक येथे आलेले होते. आज मात्र त्यांच्या खाणाखुणा तेथे दिसत नाहीत. त्यानंतर मलायातले लोक ज्यावेळी मादागास्कर येथे राहण्यास गेले त्यावेळी तेही या बेटावर काही दिवस राहून गेले. त्यांचेही अवशेष आज दिसू शकत नाहीत.

सातव्या शतकात अरब लोक येथे येत असत. त्यांनी या बेटाला 'दीनोरोवी' हे नाव दिलं होतं. 'दीनोरोवी' म्हणजे रुपयांचे बेट, धनाचे बेट. अरब लोक येथे काही दिवस येऊन रहात असत व पुन्हा जात असत. या बेटावर त्यावेळी कोणीही रहात नव्हते; त्यामुळे असं म्हणतात की, समुद्र लुटारू ठिकठिका-

णाहून धन आणून येथे धन गाडून ठेवत असत. अरबांनी त्यावरून त्याला कदाचित हे नाव दिलेले असावे.

१५०७ मध्ये पोर्तुगीज लोक या बेटात आले. त्यांचे येथे फार वर्षे वास्तव्य नव्हते. जेमतेम ७५ वर्षे ते येथे होते. त्यांनी या बेटाला 'इलहा डा सिर्नो' (Ilha da Cirno) असं नाव दिलं. त्यांनी आपल्याबरोबर जे पशू आणलेले होते ते येथेच राहिले.

१५९८ साली योगायोगाने डच लोक येथे आले. वादळामुळे त्यांना या बेटाचा आसरा घ्यावा लागला. त्यांनी 'नासू के मारिस' याच्या नावावरून या बेटाला मॉरिशस असे नाव दिले.

डच लोक आले त्यावेळी मॉरिशस हा जंगलांचा देश होता. त्यावेळची युरोपची स्थिती अशी होती की, बाजारात लाकडाची फार आवश्यकता भासत होती. डचांनी काही गुन्हेगार येथे आणले आणि लाकडे तोडून युरोपच्या बाजारपेठेत विकण्याचा व्यवसाय सुरू केला. तथापि हे काम अत्यंत जिकीरीचे असल्याने त्यांना यात फारसे यश आले नाही. आज जेथे ग्रां पोर्ट आहे तेथे १६५८ मध्ये त्यांनी आपल्या जहाजांची उतरण्याची सोय केली.


डच लोकांच्या वास्तव्यात हा प्रदेश लोकवस्तीच्या दृष्टीनें उपयोगी होऊ लागला. त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे वृक्ष येथे आणले. उसाची लागवड करायला सुरुवात केली. या कामाकरता काही गुलामही येथे आणले. त्यावेळी या देशाचा विशिष्ट पक्षी 'डोडो' येथे विपुल प्रमाणात होता. या प्राण्यावर मात्र डचांच्या-मुळे संक्रात आली. हा पक्षी उडू शकत नसल्यानें त्यांनी त्याला मारून त्याचा वंशच संपवून टाकला.

डचांनी मॉरिशसला एक शेतीप्रधान देश बनविण्याचा प्रयत्न केला. डच शेतकऱ्यांना येथे स्थायिक होण्याचे दृष्टीनेही प्रयत्न

केले. प्राचीन ग्रां पोर्ट या शहराला राजधानीचे स्वरूप दिले. तेथे एक दारू बनविण्याचा कारखाना तयार करण्याचेही प्रयत्न केले गेले. त्यांच्या काळात भारतातले अनेक वृक्ष आणि फळे तेथे उपलब्ध होती. एवढे प्रयत्न करूनही डच लोक निरंतर तेथे राहू शकले नाहीत. १७१२ च्या सुमारास या बेटाला प्लेगने पछाडले आणि डचांना हा प्रदेश सोडावा लागला. अर्थात् डचांनी हा देश सोडण्याचे प्लेग हे एकमेव कारण नाही. वारंवार येणारी वादळे. समुद्र चाच्यांचे भय, उंदरांचा होणारा अतोनात उपद्रव ही आणखीही कारणे सांगता येतील. त्याचबरोबर त्यांनी गुलामांना जी क्रूर वागवणूक दिली त्यामुळे ते जंगलात पळून जात आणि एकत्र जमून लपून हल्ला करत. या सर्व प्रकारांनी त्रस्त झालेल्या डचांना अखेर मॉरिशस देश सोडावा लागला.

या नंतरचा काळ आहे तो फ्रेंच्यांच्या राजवटीचा. १७१५ ते १८१० पर्यंत म्हणजे सुमारे ९५ वर्षे या बेटावर फ्रेंचांची सत्ता होती. फ्रेंच ज्यावेळी येथे आले त्यावेळी सुसंघटीत, सुव्यवस्थित अशी कोणतीही राज्ययंत्रणा तेथे उपलब्ध नव्हती. युरोपातून बरेच गुलाम त्यांनी आणले. आणि त्यांना कोठेही वस्ती करायला परवानगी दिली गेली. फ्रेंच आल्यानंतर मात्र या बेटाचा वेगाने विकास होऊ लागला. त्यांनी या बेटाचे नावही ‘आइल द फ्रान्स’ (फ्रान्सचे द्वीप) असे ठेवले.

१७३५ साली आलेला फ्रेंच गव्हर्नर माहे द लाबूर्दोने हा एक उत्तम प्रशासक होता. आज जे मॉरिशस उत्तम दिसते त्याचा पाया त्याने घातला असं म्हणायला हरकत नाही. मॉरिशसला राहण्यायोग्य त्याने बनविले. त्याने दक्षिण भारतावर हल्ला करून मद्रासवर अधिकार प्रस्थापित केला. भारतीय इंजिनियर यांना



माहे द लॅंबोर्दोने– फ्रेंच नव्हर्नर

मॉरिशसमध्ये आणून त्यांच्या मदतीनें पोर्ट लुई या शहराची आणि बंदराची घडण केली. पाम्प्लेमुस बागेची जागा निश्चित करून तेथें उद्यान तयार करायला सुरवात केली. तंबाखू, ऊस यांच्या शेतीची सुरुवात केली आणि मॉरिशसमधील पहिली चिनी मिल (साखर कारखाना) सुरू केली.

मॉ...३

आजही ज्या गव्हर्नर बंगल्याचा उपयोग केला जातो ती इमारत लाबूर्दोनेंच्या नंतर आलेला गव्हर्नर ने रेडयू याने बांधून घेतली होती. त्यानंतर १७६४ साली मॉरिशसची सत्ता फ्रेंच कंपनीच्या ताब्यातून फ्रान्सच्या सम्राटाच्या हातात गेली. या वेळी मॉरिशसची संख्या सुमारे साडें अठरा हजार होती. गुलामांची संख्या पंधरा हजार असून गोरे लोक सुमारें तीन हजार होते; तर मुक्त झालेले दास सहाशे होते.

पियर पोवरे याने बऱ्याच दीर्घ कालपर्यंत गव्हर्नर म्हणून काम पाहिले. याच्याही कारकीर्दीत या भागाची बरीच भरभराट झाली. सडकांचं जाळं विणलं गेलं. पॉम्प्लेमुस गार्डनचा याने इतका सुरेख विकास केला की जगातील श्रेष्ठ उद्यानात त्या बागेला स्थान मिळालं. ह्याचे नाव कुशल आणि बुद्धिमान प्रशासक म्हणून इतिहासात नमूद आहे. याच्या काळात दोनदा मोठी वादळं झाली आणि त्या भीषण संकटाला त्याला तोंड द्यावे लागले.

याच्यानंतर आलेला गव्हर्नर मेलार्त द्यू मेसले. याने शेतीसुधारणा आणि व्यापार यावर आपले लक्ष केंद्रित केले. या काळात वेगवेगळ्या देशांची जहाजे या बेटात येत असल्याने हे एक महत्त्वाचे केंद्र बनले होते. भारतीय सिल्क आणि चिनी मातीची भांडी या वस्तूंच्या मोबदल्यात नाविकांना तेथे भोजन मिळत असे.

याच वेळी फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली त्याचे पडसाद या बेटावरही उठले. येथील लोकांनीही समानता आणि स्वातंत्र्याच्या घोषणा देत राज्यकारभार आपल्या हाती घेतला. कोसिग्नी या गव्हर्नरला त्यांनी ठार मारले. त्याच वेळी एक साथीचा रोग बळावला आणि त्यात शेकडो लोक ठार झाले. प्रशासन हाती

येताच रस्त्यांची नावे बदलून त्यांना क्रांतिकारकांची नावे देण्यात आली. गुलामांना मुक्त करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. पण ही सत्ता गोऱ्यांच्या हातात असल्याने या दृष्टीने क्रांतिकारकांना प्रगती करता आली नाही. १७९६ ते १८०३ पर्यंत या बेटाने फ्रान्सशी असणारे आपले सारे संबंध तोडले आणि एक स्वतंत्र देश म्हणून राज्यकारभार चालवला.

क्रांतिकारकांच्या राजवटीला फ्रान्समधील जनता कंटाळली आणि त्यातूनच नेपोलिनयचा उदय झाला. त्याने डेकनला भारतात फ्रेंचांचा कॅप्टन जनरल म्हणून पाठवलं. पण इंग्रजांनी त्याला पांडेचरीला उतरू न दिल्याने त्याला परत यावं लागलं. नेपोलियनने मॉरिशसचे महत्त्व ओळखून डेकनला मग मॉरिशसचा गव्हर्नर म्हणून पाठवलं, त्याने शासकीय आणि सामाजिक सुधारणांच्याकडे, व्यापारवृद्धीकडे लक्ष दिले. त्यानें मॉरिशसचे पूर्वी जे आठ जिल्हे होते त्यात एकाची भर घालून नऊ जिल्ह्यात बेटाची विभागणी केली· ' सवाने ' ला जिल्ह्याचा दर्जा दिला. पोलीस आणि सेना यांना संघटित केले. बरेचसे शासकीय अधिकार आपल्याकडे ठेवले आणि अस्वस्थ आणि विस्कळीत जीवनाला स्थैर्य आणण्याचा प्रयत्न केला. त्यात तो यशस्वीही झाला.

फ्रेंच राजवटीच्या शेवटी शेवटी निग्रो गुलामांची स्थिती अतिशय वाईट होती. त्यांच्यावर फार जुलूम होत असे. फ्रेंच पाद्री अनेक निग्रो लोकांना अगदी क्षुल्लक गोष्टींच्या सबबीवर फाशीची शिक्षा देत असत. त्यावेळी मॉरिशसमध्ये मादागास्कर व आफ्रिका येथून आणलेले गुलाम, फ्रेंच जमीनदार आणि काही भारतीय असे लोक होते. भारतीय लोक घरगुती नोकर, शिंपी, सोनारकाम अशा स्वरूपाचे काम करीत असत. शाळेत फ्रेंच, लॅटीन, इंग्रजी,

आणि फारसी या भाषा शिकविल्या जात असत. कोर्टाकरता नेपोलियनने केलेले नियम मान्य केले होते.

फ्रेंचांचे नंतर इंग्रजांची कारकीर्द सुरू होते. १८१० पासून पुढे इंग्रजांनी या बेटावर अधिकार गाजवला. याचा अर्थ त्या आधी त्यांना या बेटाची माहिती नव्हती असे नाही. डच गव्हर्नर देवदानी याने लिहून ठेवले आहे की, 'जर डच लोकांनी हे बेट सोडलं तर इंग्रज याचा कब्जा घेतल्याशिवाय रहाणार नाहीत.' सोळाव्या लुईच्या बधानंतर इंग्रजांना या प्रदेशावर हल्ला करण्यासाठी सबळ कारण सापडले. समुद्रातील लुटारू त्यांची जहाजे लुटत त्यामुळे त्यांचे नुकसान होत असे. हे नुकसान थांबविण्यासाठी उपाय एकच आणि तो म्हणजे हिंदी महासागरावर प्रभूत्व मिळवून मॉरिशसवर आपला अधिकार प्रस्थापित करणे. एकदा भारतातील गव्हर्नर जनरलने या लुटारूंच्या पाठोपाठ सैन्य पाठवलंही होतं पण त्यात त्याला अपयश आलं.

१८०४ मध्ये सिशेल आणि १८०६ मध्ये केप इंग्रजांनी आपल्या ताब्यात घेतले आणि या दोन बेटांच्यामुळे हिंदी महासागरातील त्यांची स्थिती मजबूत झाली. त्यांनी मॉरिशसची नाकेबंदी करायला सुरुवात केली. याच वेळेला मॉरिशसमध्यें दोन वादळे झाल्याने तेथील जीवन विस्कळीत झाले. डेकन या गव्हर्नरने सारी परिस्थिती नेपोलियनच्या कानावर घातली आणि मदतीची मागणी केली. तथापि त्यावेळी नेपोलियन स्वतःच संकटात असल्याने त्यानें त्याकडे दुर्लक्ष केले. परिणामतः १८०९ साली इंग्रजांनी रोड्रिग्ज हे बेट आपपल्या ताब्यात घेतल्यावर १८१० साली सोळा हजार सैनिकांच्या मदतीने मॉरिशसवर हल्ला केला आणि विजय मिळवला. या सोळा हजार सैनिकात नऊ हजार सैनिक भारतीय होते.

इंग्रजांनी ज्यावेळी मॉरिशस घेतले त्यावेळी सामान्यतः सात हजार गोरे लोक, सात हजार स्वतंत्र केलेले गुलाम आणि सहा हजार भारतीय एवढे लोक तेथे होते. नेपोलियन जोपर्यंत जिवंत होता तोपर्यंत फ्रेंच लोकांना आशा होती की, इंग्रज काही काळच या बेटावर राहतील आणि नंतर हे बेट परत त्यांना मिळेल. तथापि नेपोलियनच्या निधनाबरोबरच ती आशाही नाहीशी झाली. १८१४ साली अठरावा लुई फ्रान्सच्या गादीवर बसला आणि इंग्रजांशी झालेल्या तहात मॉरिशस हे बेट कायमस्वरूपात इंग्रजांना मिळाले.

इंग्रजांचा पहिला गव्हर्नर म्हणून फाकर याची नियुक्ती झाली. हा अत्यंत लोकप्रिय गव्हर्नर झाला. त्याने अधिकारावर येताच बेटाच्या धर्म, संस्कृती आणि भाषेला योग्य मान दिला जाईल अशी घोषणा केली. त्याच बरोबर, जो कोणी सरकारच्या विरोधी वर्तन करील त्याची संपत्ती जप्त केली जाईल आणि त्याच्या गुलामांना स्वतंत्र केले जाईल अशीही द्वाही फिरवली. यामुळे फ्रेंच जमिनदार घाबरले होते. या बरोबरच उच्च वर्गातील काही लोकांना त्याने मोठ्या पदावरही नेमले आणि आपल्या बाजूला आकर्षित केले. याने या बेटाचे पूर्वीचे नाव मॉरिशस हेच पुन्हा रूढ केले.

अनेक संकटांना तोंड देऊन इंग्रजी सत्तेचा पाया भक्कम करीत असतानाच, 'सरकारने सांगितल्याप्रमाणे गुलामगिरी प्रथा बंद न करता त्याला उत्तेजन दिले,' या आरोपावरून त्याला इंग्लंडला परत बोलावले गेले. दरम्यानच्या काळात दोन गव्हर्नर आले आणि गेले; पण फाकरने प्रजेच्या मनात निर्माण केलेला विश्वास घालवून गेले. अर्थातच ते लोक प्रिय होऊ शकले नाहीत इतिहासात

त्यांच्या नावाची फक्त नोंद झाली फाकर पुन्हा १८२० ते २३ पर्यंत मॉरिशसला गव्हर्नर म्हणून आला. त्याने इंग्रजी सत्तेचा पाया दृढमूल केला.

फाकर नंतर आलेल्या लॉरी कोल यानें फाकरच्याच नीतीचा अवलंब करून फेंच जमीनदारांना न दुखविण्याचे धोरण अवलंबिले. त्यानें नवीन सडका तयार केल्या. साखर कारखान्यात नवीन प्रकारची मशिनरी उपलब्ध करून दिली. त्यानंतर चार्लस् कोलविल हा गव्हर्नर म्हणून आला. पण तो एक अदूरदर्शी गव्हर्नर होता. १८३५ च्या सुमारास विल्यम निकोले हा गव्हर्नर म्हणून आला; त्याने गुलामगिरी प्रथा बंद केली.

याच सुमारास भारतीय लोकही मोठ्या संख्येंने मॉरिशसमध्ये यायला लागलें होते. १८३५ नंतरचा इतिहास हा भारतीयांच्या मॉरिशसमधील वास्तव्याचा, त्यांच्या हलाखीच्या जीवनाचा आणि त्यांनी व इतरांनी स्वातंत्र्याकरता केलेल्या प्रयत्नांचा इतिहास आहे. पुढच्या दोन प्रकरणात आपण त्याचाही धावता आढावा घेऊ.

* * *

# ९. मॉरिशसचा इतिहास (उत्तरार्ध)

१८३५ साली गुलामगिरीची प्रथा बंद झाली आणि येथून पुढे इतिहासाचा दुसरा टप्पा सुरू झाला. हा इतिहास प्रामुख्याने भारतीयांच्या आगमनाचा आणि त्यांना सोसाव्या लागलेल्या हाल-अपेष्टांचा इतिहास आहे. अर्थात यापूर्वी तेथे भारतीय आले नव्हते अशातला भाग नाही पण त्यांची संख्या मर्यादित किंवा फारच थोडी होती. फ्रेंच्यांच्या काळातच माहे द लाबूर्दोने याने भारतीय कारागीर मॉरिशसमध्ये आणले होते. पोर्ट लुइ शहर आणि बंदर ही त्यांची निर्मिती होती. काम संपताच त्यांना वागणूक मात्र अगदी हीन मिळाली. त्यांना मजुराचे काम दिले पण ते काम करण्यास त्यांनी नकार दिला.

इंग्रजांच्या काळात सुरुवातीलाच काही भारतीय कैदी या बेटात आणले गेले. त्यांनी सडका बनवायला मदत केली. रेशमाचे किडे कसे पाळायचे हे त्या लोकांना शिकवले. ताप्तर्य १८३५ पूर्वीही भारतीय तेथे आले होते. त्यांना दु:खेही भोगावी लागली होती.

गुलामी नष्ट झाल्यानंतर भारतीयांना मॉरिशसमध्ये आणण्याला मोठे कारण सापडले. मुक्त गुलामांनी शेतीवर मजुरी करायला नकार दिला. गोऱ्या जमीनदारांची शेती मजुराविना सुकू लागली. मजूर आणणार कोठून ? हा प्रश्न त्यांना सताऊ लागला

आणि मग काहींच्या सुपीक डोक्याने याचे उत्तर दिले-भारतातून ! तेव्हापासून मोठ्या प्रमाणावर भारतीयांची आयात झाली. ते गुलाम नव्हते. मजूर होते. पण फक्त होती ती नावात भिन्नता. बाकी सारे तेच दु:ख ! त्याच यातना ! !

जमीनदारांचे दलाल भारतात जायचे. त्यांना फसवायचे. सांगायचे की, " मॉरिशसमधे तुम्ही गेलात आणि पाहिलंत तर सोनं मिळेल, सोनं ! " बिचारे गरीब मजूर या थापांना फसायचे. मॉरिशसला जायला तयार व्हायचे. त्यांच्या प्रवासाची सुरुवात आणि दु:खाची सुरुवात बोटीवर टाकलेल्या पहिल्याच पावलाने होत असे. जनावरासारखी माणसं भरायचे. पशुसारखी वागणूक मिळायची. प्रारंभीच बोटीबरोबर पारतंत्र्याचेही धक्के बसायचे. अंधाऱ्या जीवनाची ही तर सुरुवात !

मॉरिशसला पोहोचल्यावर एखाद्या डेपोत किंवा विशिष्ट ठिकाणी त्यांना ठेवण्यात येत असे. भांबावलेले लोक भिरभिरत्या नजरेने भोवताली पहात असत तो त्यांना त्यांच्या भोवती फिरणारे जमीनदारांचे दलाल घोंगावताना दिसायचे. गुळाभोवती माशा घोंगावतात तसे ! प्रत्येकजण आपल्या मालकाच्या शेतावर काम करण्याकरता मजुरांना लालूच दाखवत असे. आणि एकदा त्यांनी कोठे तरी मजुरी पत्करली की जीवनातली राहिलीसाइली आशाही नष्ट व्हायची. तेथे स्त्रियांच्यापेक्षा पुरुष जास्त आणले जात आणि जमीनदार राज्यकर्ते या लोकांना हब्शी स्त्रियांशी संबंध ठेवायला भाग पाडत; त्यांना ख्रिश्चन करण्यासाठी प्रयत्न करीत. या धोरणावर कडाडून हल्लाही करण्यात आला.

भारतीयांच्याबद्दल अनेक प्रकारच्या गैरसमजुतीही तेथे प्रचलित होत्या. हे मजूर लोक आपल्याबरोबर, येताना रोगराई आणतात

असा गैरसमज निर्माण झाल्याने १८५० साली 'हैदरी' आणि 'फत्ते मुबारक' ही दोन जहाजे सहाशें लोकांना घेऊन मॉरिशसमध्ये आली असता क्रिओल लोकांनी त्यांना तेथे उतरू दिले नाही. रोगराई पसरू नये म्हणून ! त्यांना एका निर्जन बेटावर उतरवले गेले. तेथे ना उतरण्याची व्यवस्था ना खाण्यापिण्याची ! अन्न पाण्याने तडफडत असताना दोनशे लोकांनी आपलें प्राण गमावले. मजूर ते ! ना दाद ना फिर्याद ! !

मजुरांना परवानगी शिवाय कोठेही जाता येत नसे. प्रत्येकाला ओळखपत्र दिलेलें असें. सुरुवातीला ते फुकट देत असत पण जर हरवले तर २२ शिलिंग म्हणजे त्यांच्या दोन महिन्यांच्या पगाराइतकी रक्कम भरल्याशिवाय नवीन ओळखपत्र मिळत नसे. शिवाय ते मिळविण्यासाठी शे-दीडशें मैलांची रखडपट्टी आणि अनंत हेलपाटें ! आपल्या कुटुंबियांना भोजन पोहोचती करणारी लहान लहान मुलेंही या जाचातून सुटत नसत. ओळखपत्र नसलें की मारहाण, डांबून ठेवणें काय वाटेल तो त्रास सहन करावा लागे. पोलीस जमीनदारांना सामील आणि न्यायाधीश ? फ्रेंच !

जमीनदारांच्या विरुद्ध अवाक्षर बोलायची सोय नाही; आणि एखादा मजूर बोललाच तर - - - तर ? त्याचं हे एक उदाहरण-कूपेन नावाच्या एका मजुरानें पोलिसापुढे सांगितलें की, "जमीनदाराचा डॉक्टर एक वर्षात मजुरांच्याकडे फिरकलाही नाही आणि म्हणून चिन्ना विरेन हा मजूर औषधोपचाराशिवाय मेला." झालं. त्याची शंभर वर्षे भरली. त्याचा मालक पूलें याने शिकारी कुत्र्याच्या सहाय्याने त्याची शिकार करावयाचे ठरवले. तो कोठे सापडला नाही म्हणून तो मालक कूपेनच्या झोपडीवर आला. ते पहाताच त्याची बायको म्हणाली 'अहो, ते पहा मालक. तुम्हांला

न्यायला आलें आहेत". हे ऐकताच तो भडकला. त्याने त्या गर्भवती बाईला इतकं बेदम मारलं की तीन-चार दिवसांनी तिने एका मेलेल्या मुलाला जन्म दिला आणि तीही मरण पावली.

खुनाचे हे प्रकरण कोर्टाने एक वर्ष दडपलं आणि नाईलाज झाला तेव्हा या खुनाकरता पूलेला तीन महिन्यांच्या साध्या कैदेची शिक्षा मिळाली. आणि गव्हर्नराने ती शिक्षा आणखी कमी करून ती तीन आठवड्यांची केली. एका मजुराच्या गर्भवती पत्नीच्या खुनाकरता केवढी जबरदस्त शिक्षा ? तीन आठवड्यांची साधी कैद !!

पूले सुटून येताच त्याने कूपेनवर चोरीचा आळ घेतला आणि त्यासाठी मात्र त्याला एक वर्षाची शिक्षा झाली; आणि सुटून आल्यावर काही दिवसातच तोही मेला. काय न्याय !

असे हे भारतीय मजुरांचे जीवन !!

मजुरांच्यावर इतके अत्याचार होत असताना त्यांच्या रक्षणाचे किंवा त्यांना या जाचातून सोडविण्याचे काहीच प्रयत्न झाले नाहीत असे नाही. ते पाहणेही आवश्यक आहे.

१८३४ लाली ७४ भारतीय आले. ३५ साली आणखी काही आले. त्याच वेळी यांना क्रूर वागणूक दिली जाते अशी ओरड झाल्याने १८३६ साली भारतातून मजूर आणण्यासाठी काही नियम बनवले गेले. भारत सरकारच्या परवानगीशिवाय मजूर नेता येत नसत. त्यांना परतीचे भाडे द्यायचे बंधन होते. १८३७ च्या कमिशननेही कलकत्त्याच्या, पोलिस सुपरिंटेंडेंटला काही अधिकार दिले. मजुरांना योग्य वागणूक मिळेल, जहाजात त्यांची चांगली व्यवस्था होईल अशी त्याची खात्री झाल्याशिवाय तो परमीट देत नसे. तरीही मजुरांची दुःखें कमी न होता ती वाढतच गेली.

१८३८ साली लॉर्ड ब्रोघमने इंग्लंडच्या पार्लमेंट हाऊसमध्ये याविरुद्ध आवाज उठवला. भारतीय गव्हर्नर लॉर्ड ॲकलंड याने विविध समित्या स्थापन केल्या. या सर्व गोष्टींच्यामुळे १८३९ साली या स्थानांतराला किंवा भारतीय मजूर मॉरिशसमध्ये पाठवायला बंदी घातली गेली.

तथापि ही बंदी जेम तेम तीन वर्षे टिकली. मॉरिशसच्या जमीनदारांच्या दडपणामुळे १८४२ साली काही अटींवर भारतीय लोकांना न्यायला परत परवानगी मिळाली. यात मजुरांची इच्छा असेल तरच त्यांना मॉरिशसला नेले जात असे. त्यांची काळजी घेण्याचेही आश्वासन दिले होते. या अटीवर महिना ५०० मजूर तिकडे नेण्याची परवानगी मिळाली. पण त्यावेळी तिकडे एक कायदा पास झाला आणि मजुरांच्या एका दिवसाच्या गैरहजेरीकरता दोन दिवसांचा पगार कापू लागले. किरकोळ गोष्टीवरून गैरहज़ेरी लागू लागली. पगार मिळणार पाच रुपये आणि त्यातून ही अशी कापाकापी !!

१८३४ ते ३९ पर्यंत पंचवीस हजार भारतीय मॉरिशसमध्यें आलें होते. त्यात फक्त पाचशें स्त्रिया होत्या. १८४३ पासून ते १९०७ पर्यंत साडेचार लाख भारतीय तेथे आणले गेले. या एवढ्या लोकांनी मॉरिशसची भूमी 'सुजलां सुफलां' करायला आपला घाम गाळला. मॉरिशसचे नंदनवन बनवण्याकरता असंख्य कष्ट केले. हालअपेष्टा सहन केल्या. या बदल्यात त्यांना गोऱ्यांचा जुलूम पत्करावा लागला.

'रेमी ओलिए' या पत्रकाराने या जुलमांना वाचा फोडली. पुढे १८५७ मध्ये दे प्लेंवित्ज या जर्मन माणसाने आपली नोकरी सोडून भारतीयांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. त्याने नऊ

हजार भारतीय मजुरांच्या सह्या असलेलं एक पत्र तत्कालीन गव्हर्नर आॅर्थर हैमिण्टन याला दिलं. इंग्रज सरकारनेही मजुरांच्या स्थितीची पाहणी करण्यासाठी रॉयल कमिशनची स्थापना केली. त्यांनी प्लेवित्जचे पत्र खरें मानले आणि भारतीयांच्यावर अनन्वित अत्याचार होतात हे मान्य केलें. ज्या गव्हर्नरांनी 'गोऱ्यांचे भारतीयांशी होणारे वर्तन चांगलें होते' असें म्हटले होते त्यांची कानउघडणी केली आणि पुढेही सांगितलें की, त्यांचे रिपोर्ट हे पक्षपाती अधिकाऱ्यांच्या सांगण्यावर अवलंबून आहेत. जज्जेस कायद्याची अवहेलना करतात, कायदा योग्य तऱ्हेने पालन करीत नाहीत, हे ही त्यांत सांगितले आहे.

कमिशनने पोलिसांच्या अत्याचारावर भारतीय कैद्यांच्या जीवनावरही भाष्य केले आहे. भारतीयांना पशूसारखी वागणूक मिळत असे. त्यांच्या प्रेतांनाही न्याय मिळत नसे. त्यांच्यावर यथोचित अग्निसंस्कारही होत नसे. या असल्या हालअपेष्टांच्या मुळे त्यांच्यात दरहजारी मृत्यूचे प्रमाणही जास्त होते. युरोपियनांनी त्यांना बाटवण्याचे प्रकारही असंख्य केले; पण एकंदरीत भारतीयांनी या अत्याचाराला समर्थपणे तोंड देत आपला धर्म सोडला नाही.

१९२३ पर्यंत भारतीयांना तेथें आणलें जात होते. गोरे— त्यांच्यावर अत्याचारही करत होते. तथापि तोपर्यंत काही भारतीयांनीं आपल्या मुलांना शिक्षण दिलें होते तर काहींनीं थोडी जमीनही खरेदी केली होती. भारतीयांच्या या दुःखी कहाण्या भारतातील भारतीयांच्या कानांवर पडत आणि त्याचे प्रतिसाद तत्कालीन हिंदी साहित्यातही उमटलेलें दिसतात.

१९०१ साली महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेत जाताना मॉरिशसमध्ये आले होते. त्यावेळचे गव्हर्नर आणि संस्कृत पंडित ब्रूस ह्यांचे ते पाहुणे होते. भारतीयांनीं राजकारणात रस घ्यावा आणि आपल्या मुलांना शिक्षण द्यावे असें त्यांनी आवाहन केले.

भारतीयांची स्थिती सुधारण्याचे ज्या लोकांनी प्रयत्न केलें त्यात बॅ. डॉ. मणिलाल यांचे कार्य मोठे आहे. म. गांधींच्या सांगण्यावरून ते मॉरिशसमध्यें आले होते. त्यांनी ' हिंदुस्तानी ' असे



डॉ. मणिलाल

एक हिंदी, इंग्रजी साप्ताहिक सुरू केले. ते पाच वर्षे तेथे राहिले होते. मजुरांची स्थिती पाहून दुसरे रॉयल कमिशन नेमावे अशी त्यांनी मागणी केली.

दुसरे रॉयल कमिशन ज्यावेळी मॉरिशसमध्ये आले त्यावेळी डॉ. मणिलाल यांनी पुष्कळ मागण्या केल्या आणि कमिशनने पण त्यांचा स्वीकार करून सरकारला शिफारसी केल्या. विधान परिषदेत भारतीयांना प्रतिनिधित्व मिळावे, भारतीय धर्मशास्त्राप्रमाणे झालेलें त्यांचे विवाह कायदेशीर ठरवावेत. याशिवायही कमिशनने अन्य शिफारसी केल्या. भारतीयांवर होणारे अत्याचार थांबवावेत, शाळेतून प्रमुख भारतीय भाषा शिकवाव्यात. तसेच उत्तराधिकाराचा भारतीय कायदा येथेही अमलात आणावा या आणखी काही मागण्या डॉ. मणिलाल यांनी केल्या होत्या. त्यांचा स्वीकार कमिशनने केला.

या सर्व प्रकारांनी मॉरिशसमध्ये त्यांच्याबद्दलचा विरोध खूप वाढला. मध्यंतरी ते म. गांधींना आफ्रिकेतून भेटून आले; पण या सर्व गोष्टींनी त्यांना मॉरिशसमध्ये रहाणे अशक्य करून टाकलें. अखेर १९१२ मध्ये तें भारतात आलें. भारतीयांचे दैन्य दूर करण्याचा प्रयत्न करणारा हा नेता जानेवारीं १९५६ मध्यें स्वर्गवासी झाला. आज मॉरिशसमधील भारतीय जनतेंच्या मनात डॉ. मणिलाल यांच्याबद्दल आदर आणि कृतज्ञता आहे.

भारतीय मजुरांना मॉरिशसमध्यें नेण्याचे काम १९२४ पर्यंत चालू होते. अनेकदा यावर सरकारने बंदी घालून सुद्धा, गोऱ्यांच्या दडपणामुळे तीं बंदी मागे घेण्यात आली. शेंवटी १९२४ मध्यें भारत सरकारनें कुंवर महाराजसिंह यांना भारतीयांची स्थिती पाहण्यासाठी पाठविलें. त्यांनीं सर्व परिस्थिती अवलोकन केली.

भारतीयांनी आपला धर्म, संस्कृती ही इतक्या हालअपेष्टातही कायम राखल्याबद्दल त्यांना समाधान वाटलें. पण त्यांच्यावरच्या अत्याचारांनी त्यांचे मन द्रवले. भारत सरकारला त्यांनी ही प्रथा बंद करावी असे सुचवलें आणि त्यानंतर मात्र भारतातून मजूर नेंण्याची हीं प्रथा कायमची बंद झाली.

आज मॉरिशसमध्यें असलेल्या भारतीयांनी, त्यांच्या पूर्वजांनी या साऱ्या अग्निदिव्याला तोंड दिले होतें. त्याही स्थितीत आपली परंपरा, संस्कृती, भाषा, धर्म यांचें जतन केलें हे निश्चितच कौतुकास्पद आणि अभिमानास्पद आहे यात शंकाच नाही.

* * *

# ६. स्वातंत्र्यसंग्राम आणि स्वातंत्र्यप्राप्ती

" रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ? " या वचनाची प्रचीती सर्व देशांच्या स्वातंत्र्य–संग्रामातून येते. मानव हा स्वातंत्र्यप्रिय प्राणी आहे· त्यामुळे त्याला दडपण्याचा कितीही प्रयत्न केला तरी एक दिवस असा येतो की तो आपली सारी शक्ती केंद्रित करून जुलूम, अन्याय यांचा प्रतिकार करतो. फलस्वरूप त्याला स्वातंत्र्य द्यावे लागते. तात्पर्य स्वातंत्र्य मिळत नाही मिळवावे लागते. मॉरिशसही या नियमाला अपवाद कसा असणार ?

खरं म्हणजे, फ्रेंचांच्या राजवटीतही या द्वीपातील लोकांनी स्वातंत्र्याकरता प्रयत्न केले असे म्हटले तर वावगे ठरू नये व फ्रेंच राज्यक्रांतीचा परिणाम या बेटावरही झाला. त्यांनी फ्रेंचाची सत्ता झुगारून दिली आणि आपण स्वतंत्र असल्याचे जाहीर केले. १७९० मध्ये विधानसभा प्रस्थापित करून तिचे २४ सदस्य नियुक्त केले गेले. अर्थात यात भारतीय आणि क्रिओलयांना प्रतिनिधित्व नसल्याने ही विधानसभा प्रातिनिधिक होती असं म्हणता येणार नाही. पण स्वातंत्र्याचा हा पहिला प्रयत्न होता. याचे अस्तित्व मात्र फार काळ राहिले नाही. १८०३ मध्ये फ्रेंच गव्हर्नर देकां हा मॉरिशसमध्ये आला. त्याने विधानसभा विसर्जित करून राज्यकारभाराची सारी सूत्रे आपल्या हाती घेतली.

फ्रेंचांच्या राजवटीनंतर इंग्रजांची राजवट सुरू झाली. प्रारंभीच्या काही वर्षांत जनतेला राजकारणात प्रतिनिधित्व दिले गेले नाही. इंग्रजांचा गव्हर्नर फाकर हा या बाबतीत उदासीन होता. नंतरच्या पाच-सात वर्षांत गोऱ्या लोकांना राजकारणात थोडा फार शिरकाव करता आला. १८३२ साली मात्र सरकारने एक व्यापक परिषद बनवली. गव्हर्नरला प्रशासकीय कामकाजात सल्ला देणे, मार्गदर्शन करणे ही कामे ती परिषद करीत असे. १८८६ पर्यंत या परिषदेने कार्य केले. १८८६ साली राज्यावर असणारा गव्हर्नर सर जॉन पोप हेनेसी हा प्रजेला राजकारणात जास्त प्रतिनिधित्व देण्याच्या मताचा असल्याने त्याने या परिषदेची पुनर्रचना केली. आठ अधिकारी, दहा नेमलेले सदस्य आणि दहा मर्यादित मताधिकारद्वारा निवडलेले लोक यांची ही परिषद असून ही परिषद थोड्या फार फरकाने १९४८ पर्यंत काम करीत होती.

१९०७ साली तेथे 'ॲक्शन लिबरल' या नावाने आंदोलन झाले. क्रिओल लोकांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी प्रामुख्याने हे सुरू झाले असून त्यात जी. गुह्बर्ट, डॉ. यूजो लारे ई. नैराक, आर. मेरांदो या प्रमुख नेत्यांचा पुढाकार होता. इतरही काही नेत्यांनी यात भाग घेतला होता. हे आंदोलन प्रामुख्याने जरी क्रिओलांच्यासाठी होते तरी भारतीय मजुरांच्यावर होणाऱ्या अत्याचारांच्या विरुद्धही त्यांनी लढा दिला. आणि भारतीयांनीही त्याला मान्यता दिली. रॉयल कमिशननेही आपल्या अहवालात आवर्जून सांगितले होते की, 'भारतीय लोक या देशात दोन तृतियांश असल्याने भारतीयांना प्रतिनिधित्व दिल्याशिवाय कोणतीही परिषद प्रातिनिधिक मानता येणार नाही.' तथापि समितीच्या सर्वच

मॉ...४

शिफारशी मानल्या जातात असं नाही. शिफारशीमुळे काहीही फरक पडला नाही.

या वेळी मताधिकार केवळ सुशिक्षित लोकांच्या पुरताच मर्यादित होता. १९११ साली ज्या निवडणुका झाल्या त्यात बुद्धन लाला आणि श्रीकृष्ण दासिने या दोन भारतीयांना लिबरल अॅक्शनने पाठिंबा दिला होता. या पक्षाला पुष्कळ यश मिळालं असलं तरी हे दोघेही निवडणुकीत अयशस्वी झाले. १९२१ च्या निवडणुकीतही इतिहासाची पुनरावृत्ती झाली. एस्. रामलाल आणि आर. बुद्धन हे दोघेही निवडणुकीत अयशस्वी झाले. पण नंतर मात्र श्री. बुद्धन यांना परिषदेवर गव्हर्नरने नियुक्त केले. १९११ पासून डॉ. हुसेन साहीर हेही नियुक्त सभासद होतेच. १९२५ सालापर्यंत ह्या दोघांनी परिषदेवर काम केलं.

१९२६ साली ज्या निवडणुका झाल्या त्यात मात्र हे चित्र थोडसं पालटलेलं दिसतं. ग्रां पोर्ट या मतदार संघातून डी. लाला हे निवडून आलें. जनतेनें निवडून दिलेला किंवा लोकनियुक्त असा हा पहिला भारतीय प्रतिनिधी होय. तीन दिवसांनी लगेच फ्लॅक या मतदार संघातून आर. गजाधर हे निवडून आलें. नंतरच्या निवडणुकीच्या वेळी डी. लाला यांनी राजकारण-संन्यास घेतला तर आर. गजाधर आणि अन्य तीन भारतीय उमेदवार निवडणूक हरले. निर्णय जाहीर झाल्यावर गजाधर यांना गव्हर्नरांनी परिषदेवर नियुक्त केले.

१९३५ हे वर्ष भारतीयांच्या दृष्टींनें वैशिष्टयपूर्ण वर्ष म्हटलं पाहिजे. एक तर भारतीयांना या द्वीपावर येऊन शंभर वर्षे झाली होती. हा शतसांवत्सरिक उत्सव आर्यभवनात अतिशय थाटामाटात साजरा झाला. त्यानिमित्त तेथे एक स्मारकही उभारलें गेले.

त्यावेळचा गव्हर्नर जॅक्सन याने भारतीयांचे मॉरिशसवरचे ऋण मान्य केले. भारतीयांच्यामुळेच या द्वीपाचीं इतक्या वेगाने प्रगती होऊ शकली याचीं प्रांजळ कबुली त्याने दिली. याच वर्षी डॉ. शिवसागर रामगुलाम आपलं शिक्षण संपवून, इंग्लंडहून परत आलें; आणि कलकत्त्याहून प्रा. विष्णुदयाल हे हीं आपलें शिक्षण संपवून मॉरिशसला परत आले. हा काळ असा होता की, भारतीयांच्यात नेतृत्त्व आपोआप निर्माण होत होते. तीं काळाची गरज होती. तशात हे दोघेजण योग्य वेळी सुशिक्षित होऊन परत आलेलें होते.

१९३६ साली राजकारणाच्या दृष्टीने एक महत्त्वाची घटना घडली. त्याही काळात मजुरांची स्थिती फारशी सुधारलेली नव्हती. त्यांचीं गाऱ्हाणी सरकारसमोर मांडायला अधिकृत प्रतिनिधी नव्हता. या सर्व मजुरांना एका झेंड्याखाली एकत्रित करून एक नवीन पक्ष स्थापन करण्याची आवश्यकता भासल्याने डॉ. मॉरिस कूरे यांनी लेबर पार्टीची स्थापना केली. मजुरांची स्थिती सुधारणे आणि त्यांचे हितरक्षण करणे, हे या पक्षाचे उद्दिष्ट असल्याने, सर्व भारतीय मजूर भराभर एकत्र झाले. नवीन निर्माण झालेला उत्साह, संघटना कोणत्याहीं उपायाने दबून जाणे शक्य नव्हते. १९३७ साली या मजुरांनी अत्याचाराविरुद्ध हरताळ पाळला. यावर गोऱ्या जमीनदारांची प्रतिक्रिया तीव्र होती. त्यांनीं गोळीबार केला पण त्याने हे आंदोलन दबू शकले नाहीं. परिणामतः सिरबुकन आणि ए. एम्. उस्मान यांना भारतीयांचे प्रतिनिधी म्हणून परिषदेत पाचारण करण्यात आलें. १९४० मध्ये डॉ. शिवसागर रामगुलाम आणि १९४७ साली आर्. श्रीनिवासन यांनाही प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यात आले.



...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ... क्र. २०४१२ ... दि: ...

एकीकडे राजकीय दृष्टचा बलसमृद्धी होत असता, भारतीय लोक एकत्र येत असतानाच प्रा. विष्णुदयाळ यांनी त्यांना सांस्कृतिक दृष्टचा एकत्रित आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यात नवीन उत्साह आणि नवीन उमेद, मनोधैर्य निर्माण केलं. १९४३ साली त्यांनी एक मोठा यज्ञ केला. एवढ्या मोठ्या प्रमाणावर धार्मिक कार्यक्रम आत्तापर्यंत या द्वीपावर झालेला नव्हता. तसेच शेतांवर गोऱ्या लोकांच्या समोर निदर्शनें करण्यात आली. त्यात गोळीबार झाला. एक भारतीय स्त्री ठार झाली; पण त्यातूनच नवचैतन्य निर्माण झाले. त्वेष निर्माण झाला आणि आपण मुक्त झालं पाहिजे; त्याकरता पडतील ते कष्ट केले पाहिजेत, ही भावना सर्वांच्या मनात निर्माण झाली-खंबीर मनेच स्वातंत्र्याचा संग्राम लढत असतात. सर्वजण मनोधैर्याने युक्त अशा अवस्थेत संघटित व्हायला या घटनेची मदत झाली.

१९४५ मध्ये गव्हर्नर मेकेंझी केनेडी याने अंतर्गत राजकारभारात सुधारणा करण्यासाठी एक सल्लागार मंडळ नेमले. त्यांच्या शिफारशी मुळे मॉरिशसच्या भावी इतिहासात बराच फरक पडलेला दिसून येतो. एक तर ज्यांना भारतीय भाषा येतात त्यांनाही सुशिक्षित मानले गेले आणि दहा हजारांच्या ऐवजी सत्तर हजार लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला. परिणाम असा झाला की इतिहासात पहिल्या प्रथमच बहुजन समाजाला न्याय मिळाला. या बदलानुसार झालेल्या निवडणुकीत अकरा भारतीय, सात क्रिओल. आणि फक्त एक गोरा निवडून आला. भारतीयांचे बहुमत झाले, या समितीच्या शिफासशीवरून या नवीन सदस्यांच्या समितीला परिषद म्हणण्याऐवजी विधान परिषद असे नाव प्राप्त झाले.

यानंतरच्या काळात गोरे लोक झपाट्यानें मागे पडत गेले. लोकमताचा आवाज सरकार दरबारी उठत होता. १९५३ सालीही भारतीयांना बहुमत मिळालें. सर्वधर्मियांना समानता मिळावी हा सुखदेव विष्णुदयाळ यांचा प्रस्तावही या विधान परिषदेनें मंजूर केला. परिस्थितीच अशी निर्माण झाली होती कीं भारतीयांचे प्रभुत्व वाढत होते.

१९५८ मध्यें सुखदेव विष्णूदयाळ यांनी इंडिपेंडण्ट फॉरवर्ड ब्लॉक नावाचा पक्ष स्थापन केला. त्यांच्या वारंवार मागणीमुळे प्रौढ मतदानाला मान्यता मिळाली. १९५९ सालीं ज्या निवडणुका लढविल्या गेल्या त्यात सर्व प्रौढांनी भाग घेतला होता. अर्थात भारतीयांना यातही बहुमत मिळालं हे सांगायला नकोच. पुढच्याच वर्षी एच्. आर्. वाघजी विधान परिषदेचे पहिले भारतीय अध्यक्ष झालें तर डॉ. रामगुलाम मुख्य मंत्री बनले.

१९६३ सालापर्यंत मॉरिशसमध्ये आणखी दोन राजकीय पक्षांचा उदय झालेला दिसतो. पार्टी मॉरिशिया हा पक्ष गोरे आणि काही क्रिओल यांचें प्रतिनिधित्व करीत होता तर मुस्लीम कमिटी फॉर ॲक्शन हा मुसलमानांचे प्रतिनिधित्व करीत होता. या वर्षी जी निवडणूक झाली त्यात कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्यानें सर्वपक्षी सरकार स्थापन करण्यात आले. याही वेळी डॉ. राम गुलाम हेच मंत्रिमंडळाचे प्रमुख होते. विधानपरिषदेला आता विधान सभा असे म्हटले जाऊ लागले.

इंग्लंडच्या संसदेत असं ठरलं की, जर मॉरिशसच्या विधानसभेनें स्वातंत्र्य देण्यासंबंधीचा प्रस्ताव बहुमतानें मंजूर केला तर ब्रिटिश सरकार मॉरिशसला स्वातंत्र्य देईल. हे नक्कीं झाल्यावर १९६७ साली स्वातंत्र्याच्या तत्त्वावरच निवडणुका लढविल्या गेल्या.

लेबर पार्टी, फॉरवर्ड ब्लॉक आणि मुस्लीम कमिटी हे तीनही पक्ष स्वातंत्र्याच्या तत्त्वावर एकत्र आले. त्यांनी इंडिपेन्डन्स पार्टी असा स्वतंत्र पक्ष तयार केला. पार्टी मॉरिशिया स्वातंत्र्यप्राप्तीच्या विरोधी होती, कारण तो पक्ष गोऱ्या जमीनदारांचा होता. स्वातंत्र्य-प्राप्ती याचा अर्थ भारतीयांचे प्रभुत्व स्वीकारणे हे त्यांना माहित असल्याने त्यांचा स्वातंत्र्याला विरोध होता. उलट इतर तीनही पक्ष स्वातंत्र्याकरता मते मागत होते. शेवटी इंडिपेन्डन्स पार्टीला



मॉरिशसचे मुख्यमंत्री डॉ. शिवसागर रामगुलाम

बहुमत मिळाले. डॉ. रामगुलाम हे मुख्य मंत्री झाले. सरकारनें विरोधी पक्षाचे नेते म्हणून गव्हर्नर गायतां दुवाल यांना नेमले. डॉ. रामगुलाम यांनी आपलं मंत्रिमंडळ बनवलं.

आपल्या मंत्रिमंडळासमोर त्यांनी मॉरिशसच्या स्वातंत्र्याचा प्रस्ताव मांडला. त्याच्या समर्थनार्थ केलेल्या भाषणात मॉरिशसच्या ऐतिहासिक घटनांचा आणि मॉरिशमधील जनतेला ज्या दुर्धर प्रसंगांना तोंड द्यावे लागले त्याचा आढावा त्यांनी घेतला. ज्यांनी आपल्याला मते देऊन निवडून दिले त्यांना तर या प्रसंगाने धन्य वाटेलच पण भावी पिढी देखील या निर्णयाचं स्वागत करील आणि प्रभावित होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. " दोन महायुद्धांनी सर्व मानव जातीला समान स्तरावर आणले असता काही विशिष्ट वर्ग आजही काही लोकांना श्रेष्ठ समजतो आणि मॉरिशसमधील बरीच जनता गुलामांचे वंशज असून कमी दर्जाची आहे असं समजतो ही दुर्दैवाची गोष्ट आहे " असं त्यांनी आवर्जून सांगितले. आपल्या भाषणात ते शेवटी म्हणाले, " गेले दिवस पुन्हा परत न येण्याकरता समाप्त झालेले आहेत. "

हा स्वातंत्र्याचा ठराव बहुमताने मंजूर झाला हे वेगळे सांगण्याची आवश्यकताच नाही. युगायुगाचं स्वप्न साकारणारं होतं. दास्याच्या शृंखला गळून पडणार होत्या. स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेत सारे श्वास घेणार होते. हे सारं मॉरिशसवासीयांना प्रदान करणारा दिवस, १२ मार्च १९६८ हा ठरला. या दिवशी मॉरिशसमध्ये पहिली स्वातंत्र्याची पहाट उगवली. मॉरिशस स्वतंत्र झाला.

* * *

# ७. संस्कृती संगम

मॉरिशसमध्ये विविध संस्कृतींचा संगम झाला आहे. इंद्रधनुष्यात वेगवेगळे रंग दिसतात पण सर्व मिळून एक इंद्रधनुष्य बनते. त्यातल्या कोठल्याही एका किंवा दोन रंगांना आपण इंद्रधनुष्य ही संज्ञा देणार नाही. मॉरिशसचेही तसेच आहे. कोठलीही एक संस्कृती म्हणजे मॉरिशस नव्हे. युरोप, आफ्रिका आणि आशिया यांच्यातील काही भागांच्या संस्कृतींच्या मिश्रणाने हा देश बनला आहे. विविध फुलांचा गुच्छ असावा तसा मॉरिशस आहे. इथे पाच संस्कृती गुण्यागोविंदाने नांदतात. आठ लाख लोकवस्ती असणाऱ्या या देशात चार लाखापेक्षा अधिक हिंदू आहेत, दोन लाखापेक्षा अधिक क्रिओल आहेत, दीड लाख मुसलमान, पंचवीस हजार चिनी आणि सुमारे तेरा हजार युरोपियन लोक आहेत.

मॉरिशसमध्ये विविध संस्कृतीचा संगम होण्याचे कारण त्याच्या इतिहासात शोधावे लागते. या द्वीपावर मूळचे असे कोणतेच लोक नव्हते. या द्विपावर अरब लोक काही दिवसासाठी येत असत. कालांतराने सोळाव्या शतकात पोर्तुगीज लोक येथे आले, त्यावेळी या देशाचा एकमात्र निवासी ‘ डोडो ’ नावाचा पक्षी तेथे होता. हे नावही पोर्तुगीजांनीच ठेवले होते. हा पक्षी मोठ्या कोंबडीसारखा दिसतो. डुलत डुलत चालणाऱ्या या पक्षाला उडता येत नव्हते. त्या प्रदेशात अन्य कोणी येईल आणि आपल्यावर संकट येईल

असे त्याला स्वप्नात सुद्धा वाटले नसेल. पोर्तुगीजांनी देश सोडल्यावर या निर्मनुष्य द्वीपावर डच लोक आले आणि त्यांनी या पक्षाला मारून खाण्यास सुरुवात केली. एक वेळ अशी आली की, त्या पक्षाचा एकही वंशज जिवंत राहिला नाही. राहिलं ते त्याचं नाव ! पुष्कळ काळपर्यंत मॉरिशसचे नाव 'डोडो–द्वीप' असेच चालत आले होते.

डच काही काळ राहून गेले. नंतर फ्रेंच आले, त्यांनी या देशाला वसती करण्यायोग्य बनवले. शेती करण्यासाठी मजूर पाहिजेत म्हणून आफ्रिका, माडागास्कर येथून गुलामांना आणले. पुढे या गुलामांच्या व फ्रेंच लोकांच्या मिश्रणापासून एक नवीन जात जन्माला आली. तिला क्रिओल असं म्हणतात. या लोकांनाही क्रिओल असंच म्हणतात. या काळात काही भारतीयही आले होते. फ्रेंच्यांच्या नंतर इंग्रज आले. त्यांनी भारतीय मजुरांना आणायला सुरुवात केली. भारतीयांची संख्या काही लाखावर झाली. त्याच सुमारास चिनी लोकही व्यापाराकरता तेथे आले. अशा तऱ्हेने मॉरिशसच्या छोटयाशा भूमीवर पाच संस्कृत्या एकत्र नांदू लागल्या. माणसांच्याबरोबर त्यांची संस्कृतीही प्रवास करते. त्यांच्या संस्कृतीही तेथेच स्थिरावल्या. अनेक हाल-अपेष्टांना तोंड देत तेथील जनतेने आपली संस्कृती टिकवली.

प्रत्येक प्रकारच्या लोकांचे व्यवसाय भिन्न आहेत. तेथे जे चिनी साखर कारखाने आहेत त्यांचे मालक बहुतेक युरोपीय आहेत. काही युरोपियन व्यापारी आहेत आणि काही सरकार दरबारी मोठ्या हुद्यावर आहेत. भारतीयांतील बरेचसे हिंदू आणि मुसलमान भिन्न भिन्न पेशात विखुरलेले आहेत. तथापि बरेचसे लोक मजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात. चिनी लोक दुकानदार

आहेत, बहुसंख्य क्रिओल नोकरी पेशातले आहेत. काही भारतीय शेतकरी सुद्धा आहेत.

मॉरिशसमध्ये आपल्याला विविध प्रकारचे लोक आढळतील. त्यात शुद्ध गोरे असे लोक आहेत तर दुसऱ्या बाजूला अगदी काळे लोक आहेत. आणि युरोपीयन, निग्रो, आणि इतर यांच्या मिश्रणाने तयार झालेले विविध चेहऱ्यामोहऱ्यांचे लोकही आपल्याला दिसतील. त्यांच्या रंगाकडे किंवा चेहऱ्याकडे पाहून तो माणूस कोणत्या वंशाचा असावा हे ठरविणे कठीण जाते. माणूस लख्ख गोरा असतो आणि त्याचे केस मात्र निग्रो लोकांच्या सारखे कुरळे असतात. चेहरा युरोपीय असतो तर नाव भारतीय असते. आफ्रिकी चेहऱ्यावर चिनी लोकांच्या सारखे डोळे. असे एक ना दोन विविध तऱ्हा आपणाला येथे आढळून येतील. आणि म्हणूनच वर म्हटलं आहे की, थोडा युरोप, थोडा आशीया आणि थोडासा आफ्रिका यांचे मिश्रण म्हणजे मॉरिशस.

विविध प्रकारच्या लोकांच्यात मॉरिशसमधला माणूस रहात असल्याने वेगवेगळ्या भाषेचे, धर्माचे, संस्कृतीचे ज्ञान त्याला होते. यामुळे त्याच्या पोशाखावर, अन्नावर, धार्मिक गोष्टींवर वेगवेगळे संस्कार झालेले आढळतात. हल्ली पुरुषांच्या पोशाखात फारसा फरक आढळत नाही. पँट, मॅनिला, शर्ट हा पोशाख सर्वसामान्यपणे सगळीकडे दिसून येतो. तथापि मॉरिशसमध्ये काही लोक अजूनही धोतर नेसतात. काही पायजमाही घालतात. स्त्रियांच्या पोशाखात मात्र विविधता दिसते. भारतीय स्त्रिया आणि मुसलमान स्त्रिया साड्या नेसतात. पण काही मुस्लीम स्त्रिया त्यांचा परंपरागत पोशाख– चुणीदार पायजमा आणि वर लांब फ्रॉक याचाच अवलंब करतात. चिनी आणि युरोपियन स्त्रिया

युरोपीय पद्धतीचा पोशाख घालतात; पण जुन्या वळणाच्या काही चिनी महिला त्यांचा परंपरागत पोशाख घालताना आढळतात. अशा तऱ्हेने विविध धर्म, संस्कृतीप्रमाणें वेगवेगळे पोशाख घालणारे लोकही आपल्याला तेथे दिसतील.

जेवणाच्या बाबतीतही हे वैविध्य आपणाला दिसेंल. तेथे आलेल्या लोकांच्या देशाच्या भोजनाचे मिश्रण झालेले दिसेल. तेथील मुख्य अन्न भात. भारतीय लोकांच्याप्रमाणेच डाळ भात, (वरण–भात) खाणे तेथील लोकांना आवडते. भारतीयांच्या जेवणात फारशी भिन्नता आढळत नाही. रोजच्या जेंवणात भात, भाकरी, पोळी, वरण आणि भाजीसाठी बटाटे, टमाटे, पालेभाज्या, रायते, पापड या गोष्टींचा समावेश असतो. भोजन तयार करण्याची पद्धतीही आपल्यासारखीच आहे. फरक आहे तो खाण्याच्या प्रकारात. सर्व लोक युरोपीय पद्धतीने भोजन करतात. मांसाहारही सर्रास आहे. मासे दक्षीण भारतींय पद्धतीनें तयार करतात. चिनी पद्धतीचा मांसाहारही अनेक लोकांना आवडतो.

तेथील रस्त्यांची, काही स्थानांची नावे आपल्याला डच भाषेत दिसतील, पण फ्रेंचाचा परिणाम जबरदस्त झाल्यानें किंवा हे बेट निवासयोग्य त्यांनीच केल्यामुळे बरीचशी नावे फ्रेंच भाषेत आहेत. अर्थात बनारस, गोकुळ, ब्रह्मस्थान अशी काही भारतीय तर मक्का, मदीना अशी काही मुस्लीम नावेही आपल्याला दिसून येतील.

सर्व लोक जरी एकत्र नांदत असले तरी या एकत्वातहीं विभिन्नत्व आपल्याला दिसते; चिनी लोक हे इतर लोकांच्यापेक्षा आपण वेगळे आहोत असे मानतात. त्यांच्या राहणीतील वेगळेपण जाणवते. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात चिनी लोकांचे

पूजा करतात पण स्वतःला हिंदू मात्र म्हणवत नाहीत. ते स्वतःला तामिळीच समजतात. तसेच तेथे असणारे मुसलमान हे भारतातूनच गेलेले होते. तथापि पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर त्यांनी स्वतःला पाकिस्तानी म्हणायला सुरुवात केलेली आहे, तेथें असणाऱ्या बऱ्याच हिंदू, मुसलमान आणि चिनी लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे. फ्रेंचाच्या काळात सिनातम्बू नावाच्या भारतीय कुटुंबाने एक भारतीय मंदिर देखील बांधले होते. त्यात हनुमान, कृष्ण, गरूड यांच्या मूर्तीही होत्या. पण कालांतराने हे कुटुंब ख्रिस्ती बनले. मुसलमान लोकांच्यामध्ये आपल्याला शिया, सुनी, बोहरी या पंथाचे लोक दिसतील. तसेंच हिंदूंच्यात सनातनी आर्यपंथीय, कबीरपंथीं इ. अनेक प्रकारचे लोक आढळतील.

मॉरिशसमध्ये सर्वात जास्त लोकसंख्या भारतीयांचीं आहे. अनेक हालअपेष्टात दिवस काढूनही त्यांनीं आपली संस्कृती टिकविली आहे. धर्मांतराच्या लाटेने ते फारसे विचलीत झाले नाहीत. काहींनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला पण तुलनेने पाहता असे लोक फार थोडे. वास्तविक भारतीय येथे मजूर म्हणून आले. ते गुलाम नव्हते पण गुलामांच्यापेक्षाही हलाखीचे जीवन त्यांना जगावे लागले. असं म्हणतात की, गुलामांना धर्म नसतो; पण भारतीयांनी ज्या पद्धतीने तेथील संकटांना तोंड देऊन आपल्या संस्कृतीचे रक्षण केले ते पाहिले की कौतुक वाटते आणि अभिमानही !

त्यांनी आपली संस्कृती आणि भाषा यांच्या जोपासनेकरता विविध प्रयत्न केले. तेथील शाळातून भारतीय भाषा शिकविल्या जात नव्हत्या. त्यांना सरकारी मदतही नव्हती. तरीही आपल्या घामाच्या पैशातून या लोकांनी आपली भाषा शिकविण्याचें सतत प्रयत्न केलें. तेथें असणाऱ्या मंदिरातून त्यांनीं हिंदी भाषा शिक-


विली. इतर भाषेचेंही त्याचप्रमाणे. अशा तऱ्हेने त्यांनी आपली भाषा जिवंत राखली. प्रत्येक गावात आपल्याला आर्यसमाजाची मंदिरे दिसतील. मॉरिशसमध्ये आज स्पृश्य-अस्पृश्य हे भेदभाव दिसून येत नाहीत. आर्यसमाजात हा प्रकार नसल्याने अनेक गरीब लोक याकडे आकर्षित झाले असल्यास नवल नाही. आजहीं सनातनी हिंदूंच्या घरावर भगवा ध्वज दिसेल. देवांच्या मूर्ती दिसतील.

या लोकांनी आपल्या बरोबर येताना रामायण, महाभारत, गीता हे ग्रंथ आणले होते. याच्या हस्तलिखित प्रती आपल्याला विशेष दिसतील. आजही त्यांच्या बैठकीत रामायणाच्या चौपाया सामुहिक रीतीनें आणि उत्साहानें गाईल्या जातात. हे मजूर येथे आल्यावर त्यांना अगदी एकाकी वाटत होतें. त्यांना कोणाचाहीं आसरा नव्हता. 'आपलं' असं कोणी नव्हतं. दिवसभर शेतात काबाडकष्ट करायचे, मालकाचा जाच सहन करायचा जीवन असह्य व्हायचं! मग हे दुःख कोणाला सांगणार? अगतिक झालेला माणूस भावनिक आसरा शोधतो. दुःख हलके होण्या-साठी! त्यांनीही आसरा शोधला. त्यांनाही आधार मिळाला— प्रभू रामचंद्रांचा! येथे येताना सर्वांना सर्वच रामायण येत होते अशातला भाग नाही. काहींना बालकांड, काहींना अयोध्याकांड तर काहींना अरण्यकांड! सर्व मिळून पूर्ण रामायण तयार झाले. रात्रीच्या निवांत वेळी, भयाण अंधारात हे सारे एकत्र येऊन रोज मोठ्याने हे रामायण गायचे. ती प्रथा पडली. अजूनही बैठकात रामायण गायीले जाते. लहान मुलांच्यावर संस्कार केले जातात ते रामायणाचे. सकाळी उठल्यावर मुलांना गायत्रीमंत्र किंवा रामा-यणातील काही चौपाया शिकविल्या जातात. रामायण, भजन,

कीर्तन हे अजूनही चालू आहे. प्रत्येक रविवारी हिंदू लोक आर्य-समाजात किंवा मंदिरात जातात. मंदिरात जाताना शुचिर्भूत होऊन जातात. अंगात भारतीय पद्धतीचे कपडे असतात.

विवाहादि संस्कार शास्त्रोक्त पद्धतीने, भारतीय पद्धतीने केले जातात. गावात हे संस्कार करण्यासाठीं किमान एक तरी ब्राह्मण मिळतोच. हिंदू आपापसात बोलताना भोजपुरी भाषा वापरतात. समारंभात, उत्सवात भोजपुरीतील गीतें गाईली जातात.

सर्वच लोक आपले सण अत्यंत उत्साहाने साजरे करतात. शिवरात्रीचा सण मोठा असतो. त्यावेळीं परीतलावाचे पाणी काव-



मॉरिशमधील शिवमंदिर

डीने नेऊन गावोगावच्या शंकराला त्याने स्नान घातले जाते. होळी हा दुसरा सण. सकाळी स्त्री–पुरुष आंघोळ व नित्य कर्म आटोपून

होळीचा सण रंग उधळून साजरा करतात. दुपारी बैठकात बसून ढोलाच्या तालावर होळीची गीते गातात. रंग उडवतात; आणि घरोघर प्रसाद वाटतात. होळीच्या दिवशी रात्री बैठकातूनच गात गात दूर जातात. तेथे पालापाचोळा एकत्र करून त्याची होळी केली जाते. याशिवाय मकरसंक्रांत, दिवाळी, रक्षाबंधन, गणेश जन्म, रामनवमी, कृष्णाष्टमी, दसरा, शिवजयंती, तुळसीजयंती हे सणही साजरे केले जातात. यावरून एक गोष्ट दिसते कीं, आपल्या आणि तेथील भारतीयांच्या सणात फारसा फरक नाही. कार्तिकी पौर्णिमेला बेलमार या समुद्रकिनाऱ्यावर तसेच इतर समुद्र-किनाऱ्यावर स्नानासाठी हजारो हिंदू एकत्र येतात. आपल्याकडे, गंगास्नानाने पापमुक्ती होते अशी कल्पना आहे. त्याचप्रमाणे समुद्रस्नानाने सर्व पापे नाहीशीं होतात अशी त्यांची समजूत आहे.

तामिळी लोक जानेवारीत किंवा फेब्रुवारीत 'कावडी' नावाचा उत्सव साजरा करतात. दक्षिण भारतात कार्तिकेयाच्या उपासनेची ही पद्धत आहे. लोक कावडी घेंऊन त्यात पाणी, दूध, नारळ, फुले वगैरे घेऊन मंदिरात जातात आणि हे सर्व साहित्य देवाला अर्पण करतात. ही मिरवणूकही शिवरात्रीच्या सारखीच मोठी असते. प्रेक्षणीय असते.

तुलसीदास हिंदीचे मोठे कवी. रामायण रचनाकार. त्यांच्या चौपाया तर तेथील प्रत्येक हिंदूच्या मुखी असतात, तेव्हा त्यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी होते हें सांगायलाच नको. हा दिवस हिंदी प्रचाराचा मानला जातो. रेडिओ, टेलिव्हिजन यावर खास कार्यक्रम अयोजित केले जातात.

हिंदूच्याप्रमाणेच इतर धर्मीयांचे सणही उत्साहाने साजरे केले जातात. नाताळ, नव वर्ष दिन हे ख्रिश्चनांचे सण. तसेच मुसल-

मानांचा ईद, बकरीद, मोहरम हे सणही समारंभपूर्वक साजरे केले जातात.

मॉरिशसमधील शाळांतून प्रामुख्याने फ्रेंच आणि इंग्रजी भाषा शिकविल्या जातात. इतर भाषा शिकविण्याची खाजगी व्यवस्था केलेली असते. प्राथमिक शाळा धार्मिक संस्था चालवतात. त्यांच्या पाठ्यक्रमाची केंब्रिज विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमाशी सांगड घातली आहे. डी. ए. व्ही. कॉलेज पोर्ट लुई येथील आर्यसभा चालवते. चर्चमार्फतही काही विद्यालये चालविली जातात. शिक्षक ट्रेनिंग कॉलेज आणि एक शेती विश्वविद्यालय पण मॉरिशसमध्ये आहे. उच्च शिक्षण घेण्यासाठी बहुतेकजण भारतात नाही तर युरोपमध्ये जातात.

तेथील लोक विविध भाषा बोलतात. प्रामुख्याने इंग्रजी, फ्रेंच आणि हिंदीचा प्रभाव जास्त आहे. भारतातून आलेले लोक हिंदी, तामिळी, तेलगू, मराठी, गुजराती, कोकणी इत्यादी भाषा बोलतात. तथापि तेथील लोकभाषा मात्र क्रिओल ही आहे.

पूर्वी आफ्रिकेतून जे गुलाम आणले गेले त्यांनी आपल्या मालकांशी बोलण्याकरता जी भाषा तयार केली तिलाच क्रिओल म्हणतात. काहीजण क्रिओलला फ्रेंच भाषेचे भ्रष्ट रूपही मानतात. तथापि ती त्यापेक्षा थोडी भिन्न आहे. मॉरिशसमध्ये राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ही भाषा अवगत असते. तेथील कोणीही माणसे भेटली की ती क्रिओलमध्येच बोलतात. पण या भाषेची शब्दसंपत्ती अतिशय मर्यादित आहे. आपले विचार व्यक्त करायला अथवा भावना व्यक्त करायला ही भाषा अपुरी वाटते. अशा वेळी लोक इंग्रजीचा किंवा फरेंच भाषेचा आश्रय घेतात. ही बोली भाषा

मॉ...५

असल्याने ठिकठिकाणी भाषेत फरक आढळतो. खेडेगावातील आणि शहरातील क्रिओलही वेगळी आहे. खेडेगावातील क्रिओल भाषेत भोजपुरी शब्द अधिक आहेत. वाक्य-रचनाही त्याच्याशी मिळती जुळती आहे. शहरातील क्रिओलवर फ्रेंच आणि इंग्रजीचे प्रभुत्व दिसून येईल. या भाषेत लिंग-वचनासंबंधीही स्पष्ट नियम नाहीत. कारण दासांनी ही बोली भाषा म्हणून प्रथम वापरली. परिणामतः स्थूलमानाने असे म्हणता येईल की, या भाषेला निश्चित स्वरूपाचे व्याकरण नाही. मूलतः ही भाषा जरी फ्रेंच भाषेपासून निर्माण झाली असली तरी कालान्तराने त्यात इंग्रजी, भोजपुरी, मराठी, तेलगू, चिनी या भाषेतील शब्दही आलेले आहेत. वाक्यरचना साधारणपणे हिंदीसारखी असून रोजच्या उपयोगाच्या वस्तू, शेतीसंबंधी वापरले जाणारे शब्द बहुतेक हिंदी ( भोजपुरी) मधून आलेले आहेत.

या भाषेत तसे साहित्य फारसे झालेले नाही. लोकगीते आणि 'सेगा' या त्यांच्या नृत्यप्रकारासाठी जी गीते रचलेली आहेत ती क्रिओल भाषेत आहेत. चार्लस बैसाक यांनी 'रिसाइट क्रिओल' हे पुस्तक या भाषेत लिहिले आहे. डॉ. क्यूरे यांनी १९३६ मध्ये प्रथमच या भाषेत सार्वजनिक भाषण केले. आता सभा-संमेलनातून या भाषेत व्याख्याने होतात. 'ला एपी' हे वर्तमानपत्र या भाषेतून चालविले जाते.

या बेटावर इंग्रजी भाषेतही विपुल साहित्य निर्माण झालेले दिसते. इंग्रजीतील पहिली कादंबरी 'दि टेनेटस् ऑफ वाइल्ड' यात तत्कालीन समाजस्थिती आणि मॉरिशसचे प्राकृतिक सौंदर्य यांचा समावेश आहे. शिक्षणाच्या प्रचाराबरोबरच इंग्रजीचाही प्रचार वाढला. 'हिंदुस्थान' आणि 'मॉरिशस मित्र' ही वर्तमान-

पत्रे इंग्रजीतून निघाली. भारतीय मजुरांच्या दुःखावर प्रकाश टाकण्याचे काम या वर्तमानपत्रांनी सुरेख केले. आयरिश कवी लिगेन याने भगवद्गीतेचे इंग्रजी भाषांतर केले.

याच सुमारास डॉ. शिवसागर रामगुलामही आपले शिक्षण संपवून परत आले होते. त्यांनी 'ॲडव्हान्स' नावाचे दैनिक इंग्रजी आणि फ्रेंच भाषेतून सुरू केले. त्यातून वेगवेगळ्या प्रकारचे ओजस्वी लेख लिहून सर्व देशाला खडबडून जागे केले. प्रा. विष्णुदयाळ यांचेही नाव साहित्यक्षेत्रात विशेषत्वाने घेतले जाते. त्यांनी केवळ मॉरिशसवरतीच पुस्तके लिहिली नाहीत तर भारतीय साहित्य व भारतीय संस्कृतीवर संशोधनपूर्वक पुस्तके लिहिली. त्यांनी केवळ इंग्रजीतून लेखन केले नाही तर हिंदी भाषेतूनही साहित्यनिर्मिती केली.

१९५५ साली विक्रमसिंह रामलाल यांनी 'मॉरिशस टाईम्स' हे इंग्रजी साप्ताहिक सुरू केले. ते आजतागायत सुरू आहे. या साप्ताहिकाने पुष्कळ साहित्यिकांना प्रकाशात आणले. डी. नपाल यांनी डॉ. मणीलाल यांचे चरित्र लिहिले. तसेच मॉरिशसचा इतिहासही त्यांनी लिहिला. दीपचंद बिहारी यांनी 'नेव्हर गुडबाय' आणि 'ए टच ऑफ हॅपिनेस' ह्या कादंबऱ्या लिहिल्या. याशिवाय या साप्ताहिकाने सोमदत्त बखोरी, उदित गोपाल, हुसेनजी इंदू इत्यादि लेखक मॉरिशसला दिले.

जय नारायण रॉय हेही मॉरिशसमधील प्रख्यात लेखक असून त्यांनी 'मॉरिशस इन् ट्रॅन्झिशन' हा इतिहास आणि तत्कालीन समस्या याबर उपयुक्त ग्रंथ लिहिला आहे. 'व्हेन दि टियर्स मिंगल' हा त्यांचा एकांकिका संग्रहही प्रसिद्ध आहे. याशिवाय

वेळोवेळी त्यांनी वर्तमानपत्रातूनही उद्बोधक आणि दर्जेदार लेख लिहिले आहेत.

फरेंच भाषेतही विपुल साहित्य उपलब्ध आहे. रॉबर्ट एडवर्ड हार्ट हे मॉरिशसमधील प्रख्यात कवी होते. त्यांना राष्ट्रकवी म्हणून पदवीही मिळाली होती. यांचा जन्म पोर्ट लुईमध्ये १८६१ साली झाला. यांच्या काव्यात मॉरिशसच्या निसर्गसौंदर्याची झलक तर दिसतेच पण संस्कृतीची झलकही पाहायला सापडते. कीटस्, शेले यांच्या कवितेप्रमाणेच हार्ट यांच्या काव्यात रोमॅन्टिक भाव आहेत. काव्यशास्त्राची विशेष बंधने न पाळता त्यांनी मुक्त छंदात रचना केली. फ्रेंच कादंबरीच्या क्षेत्रात मार्सेल काबो यांचे नाव प्रसिद्ध आहे. ते 'ॲडव्हान्स' या दैनिकाचे संपादकही आहेत. अन्य कादंबरीकार मॉरिशसच्या निसर्गसौंदर्यावर खूष झालेले दिसतात.

पण, वास्तवाचे चित्रण करणारे काबो हे पहिले कादंबरीकार आहेत. त्यांच्या 'नमस्ते' या कादंबरीत मजुरांच्या जीवनाचे चित्रण करण्यात आले असून त्याचे हिंदी रूपांतर अनेक वेळा टेलिव्हिजनवरही दाखविण्यात आले आहे. फ्रेंच साहित्य निर्मितीत मालकोम द सजाल, ओगिश्त तुसे, रेमोन केवेयर, स्चीले, ज्युज ज सेग्रे, एअवे मासो हे लेखकही प्रसिद्ध असून फ्रान्सपर्यंत त्यांचे यश गेलेले आढळते.

प्रा. विष्णुदयाळ यांचे नाव इंग्रजी साहित्यिकांच्यामध्ये आलेले आहेच. त्यांनी हिंदीतही विपुल ग्रंथ निर्माण केले आहेत. १९४१ साली त्यांनी पोर्ट लुइमध्ये हिंदी साहित्य संमेलनही आयोजित केले होते. त्यांनी 'जमाना' हे पाक्षिकही सुरू केले. 'मेरी कोठरियाँ', 'मेरी बंगाली कोठरियाँ', 'हिंदी व्याकरण' ही पुस्तके लिहिली. त्यांनी बेरनार्दे द से प्येर याच्या 'पाल तथा बर्जिनी' या

फ्रेंच कादंबरीचा हिंदी अनुवादही केला आहे. भारतीय नियतकालिकांतही त्यांचे अनेक लेख प्रकाशित झाले व नंतर ते पुस्तकरूपाने प्रकाशित झाले. त्यांनी हिन्दी-फ्रेंच शब्दकोशही तयार केला. ' मॉरिशस का परिचय ' आणि ' गीता का अद्‌भुत संदेश ' ही दोन पुस्तकेही त्यांनी लिहिली आहेत. तात्पर्य, त्यांनी हिंदी भाषेची मोलाची सेवा करून मॉरिशसमध्ये हिंदी भाषेची मुळे खोलवर रुजवली यात शंकाच नाही. मॉरिशसमधील विविध भाषांतील साहित्य हे असे आहे.


अशा तऱ्हेने विविध संस्कृतींच्या संगमात नहात असलेले मॉरिशस पाहिले की आपण भारताबाहेर आहोत असे वाटतच नाही. मॉरिशसची ही सांस्कृतिक ओळख त्यांच्यात आणि आपल्यात अधिक जवळीक निर्माण करायला मदत करील असे वाटते.

* * *



# ८. लोकजीवन

मॉरिशस हा आठ लाख लोकवस्तीचा छोटासा देश. यातील लोकजीवनाच्या दृष्टीने विचार करता शहरी जीवन वेगळे करता येईल आणि ग्रामीण जीवन वेगळे. तेथे रहाणारे जे लोक आहेत त्यातही तीन प्रकार दिसतात. युरोपीय लोक वेगळे रहातात. फक्त त्यांच्या त्यांच्यात मिसळतात. चिनी लोकांचेही त्याचप्रमाणे. त्यांचे असे स्वतःचे वेगळे विश्व आहे. क्रिओल, हिंदू आणि मुसलमान हे मात्र एकमेकात मिसळतात. सण, उत्सव अन्य गोष्टीतून



मॉरिशसमध्ये पूर्वी दिसणारी झोपडी

एकत्र येतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्व लोक एकमेकांच्या अधिक जवळ आलें असले तरीही सूक्ष्मतेने अवलोकन करताना हे वर्ग जाणवतात.

बहुतेक सर्व लोक (युरोप आणि चीन मधले सोडून) तेथे मजूर म्हणून आलेले होते. पूर्वी त्यांची स्थिती खूपच वाईट होती. आपल्याकडे खेडेगावात जशा झोपड्या दिसतात तशा किंवा त्याहूनही कमी प्रतीच्या झोपड्या त्यांना रहायला होत्या. आता मात्र त्यात खूपच अंतर पडले आहे. आता तशा झोपड्या गुरांना रहायला असतात. याचा अर्थ असा नव्हे की मॉरिशसमध्ये झोपडीत रहाणारे लोकच नाहीत. तसेही लोक आहेत पण अगदी क्वचित. एखादी झोपडीच तशी दिसेल. त्यात मातीचीही भांडी दिसतील; पण अशा झोपड्या किंवा अशी स्थिती अगदी अपवादात्मक.

शेतात काम करून, असंख्य हाल यातना सहन करून बऱ्याच जणांनी आपली स्थिती सुधारलेली आहे. काहींनी बंगले बांधले आहेत. मोटारीही घेतल्या आहेत! यत्नदेवाची पूजा करून सामान्यतः असं म्हणता येईल की, मॉरिशसमध्ये अशी व्यक्ती सापडणे कठीण की, जिला रहायला घर नाही, खायला अन्न नाही आणि नेसायला वस्त्र नाही. तिथे भिकारी दिसत नाहीत. माणसाने जर मेहनत केली तर त्याला चांगल्या प्रकारचे जीवन घालवता येईल अशी आजची मॉरिशसची स्थिती आहे.

सुखवस्तूंची संख्या मॉरिशसध्ये वाढत आहे. मोटारींची (मोटर कार्स) संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. मोठ्या शेतकऱ्याकडे मोटार असतेच पण नोकरी करणाऱ्यांच्याकडेही हल्ली मोटार असते. तेथे मोटारी खूप स्वस्त मिळतात. शिवाय पेट्रोलचा खर्चही,

स्वस्ताईमुळे, खूप कमी येतो. त्यामुळे मोटार ठेवणे परवडते. प्रत्येकाच्या घरात फर्निचर व्यवस्थित असते. जेवणाची टेबले, खुर्च्या, कपाट या वस्तू प्रत्येकाकडे असतात. टेबलावर सनमायका वगैरे लावलेला असतो. प्रत्येकाच्या घरी टेलिव्हिजन, कमीतकमी, रेडिओ तरी असतोच. हे चित्र केवळ शहराचेच नाही तरच ग्रामीण भागातही सामान्यतः हे चित्र दिसून येईल.

लोकांची दिनचर्या सकाळी सात-आठ वाजता सुरू होते. शाळा, कॉलेजे, ऑफिसे ही सारी सकाळी सात-आठ वाजता सुरू होतात आणि दुपारी तीन वाजेपर्यंत सर्व काम संपते. खाजगी कार्यालयेही याच वेळात असतात. त्यामुळे मॉरिशसमधील माणूस दुपारी तीन नंतर मोकळा असतो. मग कोणी समुद्रकिनाऱ्यावर फिरायला जातील तर कोणी आपल्या नातेवाईकांच्याकडे जातील. काही सिनेमा वगैरेला जाऊन करमणूक करतील. पाटर्या वगैरेंचे आयोजन विशेषतः रात्री होते. कॉकटेल पार्टीज मॉरिशसमध्ये अधिक लोकप्रिय आहेत.

पाश्चात्य विचारसरणीचा प्रभाव बराच असल्याने तेथील स्त्रियाही सुशिक्षित आहेत. महिलांना पुष्कळ प्रमाणात स्वातंत्र्य आहे. त्या शिकलेल्या असल्याने आज त्या पुरुषांच्या बरोबरीने ऑफिसमधून काम करताना आढळतात. काही काही स्त्रिया मोठ्या हुद्यांवरही काम करताना दिसतात. तरुण तरुणी एकमेकांना मोकळेपणाने भेटू शकतात.

तरुण विविध प्रकारचे खेळ खेळतात. फूटबॉल हा तेथला विशेष लोकप्रिय खेळ आहे. त्याबरोबरच गोल्फ, टेनीस हे खेळही खेळले जातात. घोडदौड हाही एक त्यांचा आवडीचा छंद आहे. पोर्ट लुई मध्ये कॅम्प द मार्स या मैदानावर घोडदौड होत असते.

तेथील लोकांचा दुसरा एक आवडता छंद म्हणजे हरिणांची शिकार. जंगलात हरिणेच जास्त प्रमाणात दिसतात. मॉरिशसमध्ये ब्लॅक रिव्हर हे क्षेत्र हरणांच्या शिकारीसाठी प्रसिद्ध आहे. बऱ्याच ठिकाणची जंगले शिकारीसाठी राखून ठेवलेली आहेत. सर्वसाधारण शिकार हा श्रीमंतांचा छंद. तथापि मध्यमवर्गीय काही लोकांच्याकडेही बंदुका सापडतात. साहेबाबरोबर तेही शिकारीला जातात. मॉरिशसची अरण्ये किंवा वने अतिशय सुरेख. बारा महिने वसंत ऋतू. हिंस्त्र पशू नाहीत. साप विंचवासारखे उपद्रवी प्राणी नाहीत त्यामुळे भीती अजिबात वाटत नाही. एखादे हरीण किंवा शहामृग मारावे. त्याचे लांब लांब शिंगे असणारे मुंडके गळ्यापर्यंत कापावे आणि ते घरी घेऊन यावे. अशी गळ्यापर्यंतची हरणांची मुंडकी गवत भरून, बसण्याच्या खोलीत ठेवलेली कित्येक घरातून दिसतील.

रविवारचा दिवस म्हणजे लोकांच्या विश्रांतीचा, आरामाचा दिवस. बहुतेक लोक रविवारचा दिवस समुद्र किनाऱ्यावर घालवणे अधिक पसंत करतात. शनिवारी दुपारीच लोक समुद्र किनाऱ्यावर असणाऱ्या बंगल्यात जातात आणि रविवार रात्रीपर्यंत पिकनिकची मजा लुटतात. या बंगल्यात खाण्यापिण्याची व्यवस्था केलेली असते.

प्रसन्न, मनमोहक समुद्र किनाऱ्यावर शंख शिंपल्यांच्या सारखी माणसे विखुरलेली असतात. समुद्राचे काळे–निळे पाणी, किनाऱ्यावरची पांढरट पिवळसर उन्हामुळे चकाकणारी वाळू, फेनधवल लाटा, आणि त्यांचा सळसळ होणारा आवाज मॉरिशसचा इतिहास तर सांगत नाही ना, असा क्षणभर भास होतो. अशा ठिकाणी जायला आणि मजा लुटायला कुणाला बरं आवडणार नाही ? गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत हा साऱ्यांना छंद आहे. कोणी पाण्यात

पोहत असतात, कोणी गळ टाकून बसलेले असतात, कोणी स्कीइंग करीत असतात. एकंदर सगळीकडे आनंद, उत्साह ओसंडून वाहत असतो.

'सेगा' हा त्यांचा एक नृत्य प्रकार आहे. याचे गीत क्रिओल भाषेत लिहिलेले असते. रात्री कागद, पालापाचोळा एकत्र करून त्याचा जाळ करतात आणि त्याच्या भोवती ढोलक्यांच्या तालावर बेभान होऊन नाचतात. आपल्याकडे "पप्पा सांगा कुणाचे" या गाण्याची जशी चाल आहे त्या पद्धतीवर या गाण्यांचा ठेका असतो. सर्व जण यात उत्साहाने भाग घेतात.

रविवारचा दिवस पिकनिककरता जसा मानतात तसाच धार्मिक कार्यक्रमांच्या दृष्टीनेही हा दिवस महत्त्वाचा आहे. रविवारी मंदिर, आर्यसभा तसेच चर्चमध्ये जाण्याची प्रथा आहे. मुसलमान लोक शुक्रवारी मशिदीत जातात. आर्यसमाजात रविवारी सकाळी हवन, प्रवचनाचे कार्यक्रम असतात. हिंदू लोक स्नान करून धोतर, शर्ट घालून या समारंभास जातात. स्त्रिया आणि मुलेही यात भाग घेतात. मंदिरातही पूजा, प्रार्थना, धार्मिक प्रवचन ठेवलेले असते. बऱ्याच हिंदूंनी जरी ख्रिस्ती धर्म स्वीकारलेला असला तरी केवळ रविवारी मंदिरात जाण्याऐवजी ते चर्चमध्ये जातात एवढेच. बाकी वागणूक, चाल-चालवणूक, हे सारे हिंदूंच्या पद्धतीचेच असते. अर्थात् याला काही अपवादही आहेत. काही लोक ख्रिश्चन झाल्यापासून हिंदूंचा तिरस्कार करतात.

शहरवासीयांचे जीवन सर्वसाधारणपणे हे असे असते. खेड्यात शेती करणारे बरेच आढळतील. मॉरिशसमधील खेडी भारतीय खेड्यांपेक्षा खूपच वेगळी दिसतील. आपल्याकडच्या खेड्यांत फारशा सुधारणा झालेल्या नसल्याने खेडे म्हणताच आपल्या

डोळयांसमोर छोटचा छोटचा झोपडचा, काही बैठी घरे, तीही अव्यवस्थित, घरा-दारासमोर कचरा, वाहणारे सांडपाणी, सगळी-कडे उडत असणारा कच्च्या रस्त्यांच्यावरील धुराळा आणि मळ-लेली काळी बेंद्री, आंघोळ न केलेली अजागळ पोरे. . . असं काहीसं वर्णन डोळयांसमोर येतं. कारणही स्वाभाविक आहे. आपण यापेक्षा वेगळी खेडी पाहिलेली नसतात. अशीच खेडी परिचयाची असल्याने खेडे म्हटले की मग ते भारतातले असो, नाही तर अन्य ठिकाणचे असो, आपल्या डोळयांसमोर वरील चित्र उभे राहील. पण मॉरिशसमधील गावे यापेक्षा अगदी भिन्न आहेत. तेथील लोकांची राहणी पाहिली, घरातील वस्तू, टापटीप पाहिली की आपण एखाद्या खेडचात बसलो आहोत असं वाटणारसुद्धा नाही, इतकी ती चांगली आहेत.

ह्या खेडयांची स्थिती पूर्वीपासूनच अशी होती अशातला भाग नाही. भारतातून ज्यावेळी मजूर लोक तेथे गेले त्यावेळी त्यांची गावे ही आपल्या खेडेगावांसारखीच होती. कालान्तराने त्यांना मिळालेली शेती ही सामान्य प्रतीचीच होती; पण त्यांनी केलेले अथक परिश्रम, त्यांची चिकाटी आणि जिद्द यांनी सारेच चित्र बदलून टाकले. त्याचाच परिणाम खेडेगावांचे आधुनिकीकरण होण्यावर झाला.

सामान्यपणें शहर आणि गाव यात आपल्याला फारसा फरक दिसणार नाही. तेथील गाव आणि शहरे ही एकमेकांपासून इतकी जवळ आहेत, एकमेकाला इतकी लागून आहेत की एका शहराचेच ते भाग वाटावेत. शहर संपले की उसाची शेते सुरू होतात. लांबच लांब पसरलेली उसाची शेते पाहिली की गावाचे अस्तित्व लक्षा-तही येत नाही. वाटतं मैलन् मैल ही शेतेच पसरलेली आहेत.

आज खेडेगावात आपल्याला बहुतेक पक्की घरे दिसतात. याचे सारे श्रेय तेथल्या वादळाला दिले पाहिजे. ही वादळे उन्हाळ्यात येतात. दरवर्षी या बेटाला वादळाला तोंड द्यावे लागते. कैरोल, झेलेक्स, जेनी ही तेथल्या वादळाची नावे आहेत. ही नावे वाळाच्या वेगावरून दिलेली आहेत. कैरोल व झेलेक्स ही वादळे जर आली तर घराबाहेर पडणेही मुश्कील होते. ताशी शे–दीडशे मैलांची ही भयानक वादळे असतात. यामुळे काही वेळा असं वाटतं की, हे चिमुकले बेट उडून तर जाणार नाही ना ? वादळापूर्वी रेडिओवर सूचना देण्यात येतात.

जोराचे वादळ आले की, बेटावरचे सारे जीवन उध्वस्त होते. १८८२ सालच्या प्रचंड वादळानंतर १९६० साली फार मोठ्या वादळाला मॉरिशसला तोंड द्यावे लागले. या वादळात ८० पैकी ६२ चर्चेस उध्वस्त झाली. समुद्रकिनाऱ्यावर असणाऱ्या दीडशे नावा बुडाल्या. बेचाळीस लोक ठार झाले. ऐंशी गंभीर जखमी झाले आणि सातशे लोक साधारण जखमी झाले. या वादळात जास्तीत जास्त जर कोणाचे नुकसान झाले असेल तर ते घरांचे ! ४१ हजार घरे नष्ट झाली आणि चोवीस हजार घरांचेही नुकसान झाले. त्यांचीही छपरे उडून गेली. या वादळामुळे गावांची स्वरूपे पार बदलून गेली. पूर्वीच्या झोपड्या आणि कच्ची घरे गेली; तेथे सिमेंट कॉंक्रीटची पक्की घरें आली. सरकारनेंही या कामी खूप सहाय्य केले. यामुळेच आज मॉरिशसमधील घरे चांगली आधुनिक पद्धतीची दिसून येतात.

घरे पक्की असून प्रत्येक घराच्या पुढे आपल्याला बाग दिसून येईल. ही हिरवळीने आणि फुलांनी फुललेली बाग आपले मन आकर्षून घेईल. बगीचात वेगवेगळी फुले दिसून येतील. मोगरा,

गुलाब, जाईजुई, झेंडू, अस्टर ही आपणांकडे आढळणारी फुले आपल्याला तेथेही दिसून येतील. पुष्कळशा भाज्याही हे लोक पिकवतात. पालेभाज्या खाण्याकडे ह्या लोकांचा विशेष कल आहे. शेवग्याच्या पानांची किंवा तांबड्या भोपळ्याच्या पानांची हे लोक भाजी करतात. समुद्र किनाऱ्यावर मासे चांगले मिळत असल्याने दोन–तीन दिवसानंतर एकदा तरी मासे खायला मिळतात. मॉरिशसमध्ये जी पोस्टाची तिकिटे आहेत त्यावर विविध माशांची चित्रे आपल्याला पाहायला सापडतील. बहुतेक सर्व लोक मांसाहारी आहेत.

निरनिराळ्या गावी, त्यांच्या चिमण्या शहरात आठवडा बाजार – म्हणजे भाजी बाजार भरतो. अगदी पुण्याची मंडईच आहे की काय असा भास होतो. या ठिकाणी व्यवहार करायचा म्हणजे सामान्यपणे क्रिओल भाषा यावी लागते. कारण सर्व जण क्रिओलमध्येच बोलतात. काही व्यापारी मात्र इंग्रजी, हिंदीचा वापर करतात. येथे रस्त्यावर काही वयस्कर स्त्रिया आपली शेगडी व कढई घेऊन बटाटे वडे, भजी, परोठा इ. पदार्थ विकत बसलेल्या जागोजागी दिसतात. फुटाणे, शेंगदाणे, वेगवेगळ्या प्रकारचे केक विकणारेही रस्त्यावर दिसतात.

खेडेगावात रहाणारे लोक शेती किंवा शेतमजुरी करतात. काही नोकरी करणारे पण आहेत. खेडेगावापर्यंत पक्क्या रस्त्यांचे जाळे असल्याने आणि कोणताही भाग फार लांब नसल्याने कारमध्ये बसून नोकरीच्या ठिकाणी जाता येते. रहाणीमान उंची असल्याने खेडेगावातही शेतकऱ्यांकडे आपल्याला मोटारी दिसतील. घरात अद्ययावत् फर्निचर, टेलिव्हिजन ह्या गोष्टी प्रत्येकाकडे

दिसतील. खेडगावापर्यंत वीज, पाणी आणि पक्क्या सडका आहेतच. गावात कोठेही घाण दिसणार नाही.

गावात भारतीय लोक असल्याने प्रत्येक गावात आपल्याला मंदिर, आर्यसभा दिसून येईल. प्रत्येक गावात 'बैठक' (बैठकीचा हॉल) आपल्याला आढळेल. दिवसभर काम करून आल्यावर रात्री लोक तेथे जमा होतात. विचारविनिमय करतात. चर्चा करतात. याशिवाय भजन, कीर्तन, रामायण-पाठ, प्रवचन इ. कार्यक्रमही होत असतात. सांस्कृतिक दृष्ट्या हे फार महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक गावात पंचायत असते. पंचायतीच्या निवडणुका होतात. मान्यवर व्यक्ती त्याची अध्यक्ष बनते. पंचायत गावाच्या दिवाबत्ती (वीज), पाणी, स्वच्छता या गोष्टींच्याकडे लक्ष देत असते. ग्रामीण भागातील पोशाखात आणि शहरी पोशाखात फारसे अंतर नाही. मागील प्रकरणात पोशाखासंबंधी सविस्तर माहिती दिली आहेच.

प्रत्येक छोट्या गावात प्राथमिक शाळा असते. ती सरकार-मार्फत चालविली जाते. याशिवाय इतर भाषांचे शिक्षण देण्या-साठी खाजगी स्तरावर शाळा चालविल्या जातात. गावातील लोक या शाळेचा खर्च भागवतात. सर्व मुले शाळेत जात असल्याने शिक्षणाचा स्तर खूपच उंच आहे. गावाजवळ असणाऱ्या मोठ्या नगरात माध्यमिक शाळेची व्यवस्था असते. प्राथमिक शिक्षणानंतर विद्यार्थी तेथे शिक्षणासाठी जातात.

गावात वैद्यकीय व्यवस्थाही चांगली असते. घरांची भाडी अगदी बेताची असतात. प्रत्येक गावात एक समाज-कल्याण-केंद्र असते. त्याच्या द्वारा सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम चाल-विले जातात. जनतेला सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीव

देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका हे केंद्र करीत असते. प्रत्येक केंद्रान्तर्गत प्रसुती व शिशू कल्याण केंद्र असते. लहान मुलांना निःशुल्क दूध-पुरवठा केला जातो. ठराविक दिवशी डॉक्टर येतात आणि रोग्यांना औषधपाणी देतात. या केंद्रामार्फत करमणुकीचे कार्यक्रमही आयोजित केले जातात. प्रत्येक केंद्रात टेलिव्हिजन सेट असतो. रात्री टेलिव्हिजन कार्यक्रम पहाण्यासाठी लोक एकत्र येतात.

मॉरिशसमधील लोकजीवन हे असे आहे. आपल्या जीवनमाना-पेक्षा तेथील जीवनमान खूपच उंचावलेले आपल्याला दिसेल. त्यांनी आत्तापर्यंत जे अपरमित कष्ट केले आणि शून्यातून स्वर्ग निर्माण केला त्याचे हे गोड फळ त्यांना मिळाले आहे. आज सामान्यपणे सर्व माणसे सुखी आहेत असं म्हणायला हरकत नाही.

* * *

# ९. भारत आणि मॉरिशस

आतापर्यंत मॉरिशससंबंधी त्रिविध दृष्टिकोनातून माहिती मिळविली. तेथल्या निसर्गसौंदर्याने आणि मोहक समुद्रकिनाऱ्यांनी आपण हरखून गेलोत. इतिहास समजावून घेतला, त्यांच्या समाजजीवनाची आणि सांस्कृतिक जीवनाची माहिती करून घेतली. या सर्व गोष्टींच्यावर ओझरता दृष्टीक्षेप टाकला तर मॉरिशस हा एक 'छोटा भारतच' आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सांस्कृतिकदृष्टचा हे दोन देश अगदी जवळचें आहेत. आपणाकडे असणारे सर्व धर्म-पंथ तेथेही आहेत. अशा स्थितीत भारत आणि मॉरिशसचे सांस्कृतिक संबंध अधिक दृढ व्हायला पाहिजेत. आपल्यात त्यांच्याबद्दलचीं जवळीक, जिव्हाळा निर्माण झाला पाहिजे. आणि भौगोलिक दृष्टचा जरी आपण लांब असलो तरी मनाने, सांस्कृतिक संबंधाने आपण अधिक जवळ येण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

वरवर पाहिले तर मॉरिशस आणि भारत यांचा संबंध एकोणीसाव्या शतकापासून सुरू झालेला दिसतो. इंग्रजांनी भारतातून मजूर नेण्यास सुरुवात केली तीच भारतीयांच्या मॉरिशसच्या संबंधाची नांदी असं म्हटलं जातं. तथापि या दोन देशांचे संबंध बरेच जुने आहेत. आपल्याकडील काही खूप जुन्या (संस्कृत भाषा बोलीभाषा म्हणून सर्रास वापरली जात होती त्या काळी) नकाशात मॉरिशस बेट दाखवले आहे. भारतीय या बेटाला 'द्वीप' म्हणत,

असाही उल्लेख आलेला आहे. त्यावरून पूर्वीपासून भारतीयांना हे बेट माहित होते असे म्हणायला हरकत नाही.

समुद्रावरील चांचे भारताच्या समुद्रकिनाऱ्यांना सतत उपद्रव देत असत. त्यांना पिटाळून लावण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांचे आरमार मॉरिशसपर्यंत जात असे. टिपू सुलतानाने इंग्रजांशी लढण्यासाठी मॉरिशसच्या फ्रेंच राज्यकर्त्यांची मदत मागितली होती. हे सारे लक्षात घेता वेदकालापासून निर्माण झालेला संबंध कोणत्याना कोणत्या स्वरूपात ऐतिहासिक कालातही चालूच होता. पुढे इंग्रजांच्या काळापासून हा संबंध अधिकच वाढला.

आजही या दोन देशांचा सांस्कृतिक संबंध वाढत आहे. आपल्याकडचे श्रेष्ठी तिकडे जाणे किंवा तिकडचे प्रमुख लोक इकडे येणे ह्या गोष्टीही चालू आहेत. आपल्या महामंत्री इंदिरा गांधी यांनी दोन वर्षांपूर्वी मॉरिशसला भेट दिली होती. मॉरिशसचे महामंत्री डॉ. रामगुलाम हेही भारतात येऊन गेले.

वरच्या स्तरावरच या भेटी-गाठी न होता सामान्य लोक, कलावंत हेही हल्ली जा ये करीत असून त्यायोगे हे सांस्कृतिक संबंध दृढ होत आहेत. आपल्याकडील चित्रपट कलावंतांनीही सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मॉरिशसला भेट दिली होती. तेथील एक मोठे चित्रकार श्री. कोंडी हे सध्या भारतात आले आहेत. याशिवाय मॉरिशसमध्ये उच्च शिक्षणाची अद्ययावत सोय नसल्याने पुष्कळ विद्यार्थीही भारतात येऊन उच्च शिक्षण घेत असतात. तामीळनाडू आणि महाराष्ट्र सरकार यांनी आपल्या अखत्यारीतील विद्यापीठातून इंजिनिअरिंग, शेती, वैद्यकीय या विभागांसाठी काही जागा मॉरिशसमधील विद्यार्थ्यांच्याकरता राखीव ठेवल्या आहेत. त्याचाही फायदा त्यांना मिळतो.

मॉरिशसमध्ये सुमारे चाळीस हजार लोक मराठी भाषा बोलतात. पण अलिकडे मराठी वाङ्मय विपुल प्रमाणात तेथे उपलब्ध नसल्याने व मराठी शिकविण्याच्या सोयी कमी पडत असल्याने त्याचा मराठी भाषिकांवर निश्चित परिणाम झाला आहे. तेथील मराठी भाषिकांना मराठीबद्दल, महाराष्ट्राबद्दल आपुलकी आहे. जिव्हाळा आहे. 'बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा' हे गीत आणि 'मराठी असे आमुची मायबोली' हे गीत ते अभिमानाने म्हणतात. तेव्हा आपण महाराष्ट्रीयनांनी तेथे जाऊन त्यांच्या इच्छेप्रमाणे मराठीचे विपुल वाङ्मय त्यांना दिले पाहिजे. तेथील लोकांना मराठी शिकविण्याचा किंवा त्या दृष्टीने योग्य ते सहाय्य देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

याशिवाय अन्य मार्गांनीही ह्या दोन देशांचे सांस्कृतिक संबंध वृद्धिंगत होत आहेत. मॉरिशसमध्ये 'महात्मा गांधी इन्स्टिटयूट' बांधणार आहेत. त्याकामी भारत सरकार त्यांना मदत करणार आहे.

तात्पर्य, भारत आणि मॉरिशस यांचे पूर्वापार संबंध होते. आता स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे संबंध अधिक दृढ होत आहेत, आणि ते यापेक्षाही दृढ झाले पाहिजेत. आपण विद्यार्थ्यांनी ह्या गोष्टी समजावून घेतल्या आणि भावी काळात सांस्कृतिक देवाण-घेवाण वाढविली तर दोन अडीच हजार मैल लांब असणारे हे छोटेसे बेट आपल्या पुष्कळ जवळ येऊ शकेल आणि एकत्वाची, जिव्हाळ्याची, प्रेमाची भावना सायीसारखी दाट होत जाईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
२०८४३
५६६ 30।3।75,

* * *

REFBK-0020453

REFBK-0020453